# कडगांव रस्ता-पूल प्रकल्पाचा सामाजिक परिणाम अहवालः २०१९




विजय ककडे

ज्ञानदेव तळुले

महादेव देशमुख

अर्थशास्त्र अधिविभाग

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६००४



जून २०१९

## Study Team

| | |
|---|---|
| Vijay Kakade | SIA Coordinator |
| Dnyandev Talule | Principal Author and Report Editing |
| Mahadev Deshmukh | Field Data Coordination |
| Pravin Babar | Data Tabulation |
| Vittal Thabbe | Office Communication |
| Vilas Mankar (GIPE) | Report Setup and Printing |

**Disclaimer:**

*The entire information and data base that the present report carries are strictly based on the field investigation, FGDs and the field observations of the study team. Neither the information in any form in the present report carries any personal impression nor does it carry any biased mention by any of the member of the study team.*

*University or University Staff shall not be responsible to mishap or damage caused to manpower or property while further applying the results of the consultancy project.*

# कडगांव रस्ता-पूल प्रकल्पाचा सामाजिक परिणाम अहवाल: २०१९


विजय ककडे

ज्ञानदेव तळुले

महादेव देशमुख



अर्थशास्त्र अधिविभाग

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६००४

जून २०१९

प्रा. (डॉ.) देवानंद बी. शिंदे
एम.एस्सी., पीएच.डी.
कुलगुरू
Prof. (Dr.) Devanand B. Shinde
M.Sc.,Ph.D.
Vice-Chancellor

Estd :1962
NAAC 'A' Grade
शिवाजी विद्यापीठ,
विद्यानगर, कोल्हापूर – ४१६ ००४.
SHIVAJI UNIVERSITY,
Vidyanagar, Kolhapur - 416 004.

दूरध्वनी : कार्यालय – (०२३१) २६०९०६०
निवास – (०२३१) २६०९०५३
फॅक्स : ००९१-२३१-२६९१५३३
Tel. : Office - (0231) 2609060
Resi. - (0231) 2609053
Fax : 0091-231-2691533
E-mail : vcoffice@unishivaji.ac.in
Web : www.unishivaji.ac.in

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाचा समावेश शासनाच्या विविध कल्याणकारी व आर्थिक योजनांचे मूल्यांकन करणारी संस्था म्हणून महाराष्ट्र शासनाने आपल्या नामिकेत समाविष्ट केला ही आनंदाची व अभिमानाची तसेच जबाबदारीची बाब ठरते. या कामी अर्थशास्त्र विभागाने अथक परिश्रम घेऊन प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल तयार केला आहे. शासन सामाजिक व आर्थिक विकासासाठी जे विविध प्रकल्प राबविते त्यातून काही लाभार्थी घटक व काही त्याचा भार सहन करणारे प्रकल्पग्रस्त होतात. ज्यांना लाभ होतो त्यांनी ज्यांचे नुकसान होते त्यांना पुरेशी नुकसान भरपाई दिली तर सामाजिक कल्याणात वाढ होते. परंतु प्रत्यक्ष अनुभव असे दाखवतो की विविध सिंचनप्रकल्प, रस्ते बांधणी याबाबत प्रकल्पग्रस्तांकडे पुरेश्या गांर्भीयाने व तातडीने लक्ष न दिल्याने प्रकल्प रेंगाळून खर्च जसे वाढले तसेच त्याची आर्थिक व मानसिक, सामाजिक किंमत प्रकल्पग्रस्तांनी दिली. या प्रश्नांची सोडवणूक अधिक प्रभावी व समाधानकारक होणेसाठी 2014 मध्ये "सुयोग्य मोबदला कायदा" करण्यात आला. व त्यामध्ये प्रकल्पांचा सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यासकरण्याची महत्वाची अट घालण्यात आली. अशा सामाजिक परिणाम निर्धारण अभ्यासातून तटस्थ परंतु व्यावहारिक उपाययोजना सुचविण्यासाठी त्या प्रकल्पांचे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक परिणाम तपासणे महत्वाचे ठरतात. असा साकलिक अभ्यास, कळगाव–रस्ता पूलबांधणी प्रकल्पाबाबत अर्थशास्त्र विभागाचे प्राध्यापक व प्रकल्प समन्वयक विजय ककडे, सहसमन्वयक ज्ञानदेव तळुले व एम.एस. देशमुख यांनी तयार केलेला असून हा अहवाल शासनास धोरण निश्चितीसाठी महत्वाचे साधन ठरते. शिवाजी विद्यापीठाचे असे सामाजिक योगदान उत्तरोत्तर वाढत जाईल याची मला खात्री वाटते. व असे मुल्यांकनाचे कार्य सतत विस्तारत राहावे अशी शुभेच्छा व्यक्त करून संपूर्ण अभ्यासगटाचे अभिनंदन करतो. शासनाने व्यक्त केलेला विश्वास ही महत्वाची जबाबदारी शिवाजी विद्यापीठ पूर्ण क्षमतेने पार पाडेल याची खात्री वाटते.

(देवानंद शिंदे)
कुलगुरू

## महाराष्ट्र शासनाच्या योजनांच्या मूल्यमापनासाठी सल्लागार समिती

| अ. क्र. | नांव | पदनाम |
|---|---|---|
| 1 | प्रा. डॉ. देवानंद शिंदे, मा. कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | अध्यक्ष |
| 2 | डॉ. विलास डी. नांदवडेकर, मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | सचिव |
| 3 | प्रा. डॉ. व्ही. बी. ककडे, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | मुख्य समन्वयक |
| 4 | प्रा. डॉ. एम. एस. देशमुख, अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | सह. समन्वयक |
| 5 | डॉ. जी. एस. कुलकर्णी, उपकुलसचिव, अभियांत्रिकी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | सह. समन्वयक |
| 6 | श्री. ए. बी. चौगुले, वित व लेखा अधिकारी, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. | वित्त सल्लागार |

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | तपशील |
|---|---|
| **कार्यकारी सारांश (Executive Summary)** | |
| **I प्राक्कथन** | |
| **II औपचारिक वास्तव** | |
| **प्रकरण १: रस्ते, महामार्ग, पायाभूत सुविधा व भूसंपादन विषयक विवेचन** | |
| १.१ | महामार्ग प्रकल्प कामी प्रसंगी अतिरिक्त जमीन अधिग्रहण |
| १.२ | सरकारकरीता धडा |
| १.३ | न्याय्य विस्थापन आणि पुनर्वसनाच्या दिशेने |
| **प्रकरण २: माहिती संकलन व अभ्यास कार्यपद्धती** | |
| **प्रास्ताविक** | |
| २.१ | अभ्यासाची उद्दिष्टे |
| २.२ | अभ्यास पद्धती |
| २.३ | अभ्यासाची पूर्वपिठीका |
| २.४ | सामाजिक परिणाम अहवाल साधने आणि पद्धती |
| २.४.१ | सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रिया |
| २.५ | सापनि अभ्यास पद्धतीतील टप्पे |
| २.६ | प्रकल्प प्रभाव क्षेत्राची पार्श्वभूमी |
| २.६.१ | बहुविध स्त्रोत माहिती संकलन |
| २.६.२ | प्रकल्पबाधीत, प्रतिगामी - अवगामी भागधारक आणि नियंत्रण समूह |
| २.६.३ | विशेष समूह चर्चा (Focused Group Discussions) |
| **प्रकरण ३: कडगांव रस्ता-पूल प्रकल्प लाभधारक गावांचे पायाभूत सुविधा सर्वेक्षण** | |
| **प्रास्ताविक** | |
| ३.१ | प्रश्नावलीचे स्वरूप व पायाभूत सुविधा माहिती संकलन |
| तक्ता ३.१ | प्रकल्पलाभधारक गावांच्या पायाभूत सुविधा |
| **प्रकरण ४: कडगांव रस्ता-पूल बांधकाम प्रकल्पबाधीत कुटुंबावरील सामाजिक व आर्थिक परिणामाचे अवलोकन** | |
| **प्रास्ताविक** | |
| ४.१ | जमीन संपादनाची पूर्वपिठिका |
| ४.२ | प्रकल्पबाधीत कुटुंबाची सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी |
| ४.३ | प्रकल्पबाधीत कुटुंबाचे धारणक्षेत्र विषयक |
| ४.४ | कुटुंबाची आर्थिक व सामाजिक परिस्थिती |
| ४.५ | धारणक्षेत्र, उत्पादकता व परिसरातील शेतजमिनीच्या बाजारभावाचे विवेचन |

| | |
|---|---|
| ४.६ | प्रकल्पबाधीत कुटुंबाची वित्तीय/कर्जविषयक स्थिती |
| ४.७ | प्रकल्पबाधीत कुटुंबाची भूमी अधिग्रहण पार्श्वभूमी |
| ४.८ | अधिग्रहणाविषयी प्रकल्पबाधीत कुटुंबाची अनभिज्ञता |
| ४.९ | प्रस्तावित अधिग्रहणाचे स्थल परिप्रेक्ष्य |
| ४.१० | शासनाकडून प्रकल्पबाधीत कुटुंबाची अपेक्षा |
| **प्रकरण ५: प्रकल्पबाधीत कुटुंबाच्या न्याय्य मागण्या** | |
| ५.१ | अधिग्रहण पार्श्वभूमी व मोबदल्याविषयी |
| ५.२ | पार्श्वभूमी |
| ५.३ | प्रकल्पबाधीत जमिनीच्या मोबदल्याविषयी |
| **सारांशात** | |
| **प्रकरण ६: निष्कर्ष व शिफारशी** | |
| **Annexure** | |
| **Annexure I: Beneficiary Village(s) Infrastructure Survey Questionnaire** | |
| **Annexure II: Project Affected Household Survey Questionnaire** | |
| **संदर्भसूची** | |

# कार्यकारी सारांश (Executive Summary):

## I) प्राक्कथन:

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ ला जोडणारा एकूण ३७ किलोमिटरचा पक्का रस्ता कोल्हापूर जिल्ह्याच्या भुदरगड तालुक्यातील अनुक्रमे ममदापूर, सोळांकूर, मोघर्डे, पनोरी, ऐणी, आरेगाव, राजापूर, जळकेवाडी, रक्षादेवी, नितवडे व कडगांव अशा एकूण दहा गावांना जोडून पुढे आजरा तालुक्यात उपरोल्लेखित महामार्गास जावून मिळतो. प्रस्तुत पक्का रस्ता या सर्व दहा गावांना जोडून त्यावरील वाहतूक सुकर व शक्य होण्याकरीता मौजे कडगांव, ता. भुदरगड हद्दीत २.६९ कोटी रूपये खर्चाचा एक मोठा पूल बांधणे आवश्यक आहे. प्रस्तुत पुलाकरीता मौजे कडगांव येथील शेतकरी श्री. आत्माराम दत्तात्रय देसाई यांची जमीन संपादित करणे आहे. परंतु प्रस्तुत शेतकऱ्याचा जमीन अधिग्रहणास विरोध असल्यामुळे प्रस्तावित पुलाचे बांधकाम ठप्प झाले असून उपरोल्लेखित सर्व दहा गावांना जोडणाऱ्या रस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत राहिले आहे. प्रकल्पप्रलंबनाचे प्रमुख कारण प्रकल्पबाधीत शेतकऱ्याच्या त्याच्या जमीन अधिग्रहणाच्या बदल्यात असलेल्या मागण्या पूर्ण न होणे हे आहे. त्यामुळे प्रस्तुत रस्ता-पूल प्रकल्पाच्या प्रलंबनाच्या कारणांचा मागोवा घेवून उभयपक्षी (प्रकल्पबाधीत शेतकरी व सार्वजनिक बांधकाम खाते) मान्य होवू शकेल असा परिस्थितीजन्य अभ्यासपूर्ण सापनि (Social Impact Analysis) अहवाल तयार करण्याचे काम शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागामार्फत पूर्ण करण्यात आले आहे. प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल प्रामुख्याने प्राथमिक माहितीवर निर्भर असून याकामी प्रकल्पबाधीत कुटुंबाची आवश्यक तितक्या वेळा भेट घेवून प्रश्नावली व चर्चेच्या माध्यमातून प्राथमिक माहितीचे संकलन केले असल्याने प्रस्तुत सापनि अहवाल सत्यतेच्या निकषांवर पात्र ठरू शकतो अशाच प्रकारे तयार करण्याचा प्रयत्न केला आहे.

## II) औपचारिक वास्तव:

प्रस्तावित रस्ता-पूल प्रकल्प व प्रामुख्याने मौजे कडगांव, तालुका भुदरगड हद्दीत बांधावयाच्या पुलामुळे एकूण दहा गावांना त्याचा लाभ होणार असून या सर्व गावांची मानवी, कृषी व व्यापारी वाहतूक प्रस्तावि पूलाच्या बांधकामावर निर्भर आहे. कारण या सर्व वाहतुकीकरीता सध्या मौजे कडगांव येथील कोल्हापूर बंधाऱ्यावरूनच वाहतूक होत असल्याने ते अत्यंत धोकादायक असल्यामुळे प्रकल्पबाधीताच्या जमीन त्यागाचा मोबदला देताना सार्वजनिक बांधकाम खात्याने व्यवस्थित विचार करून तसे प्रकल्पबाधीतास कागदोपत्री आश्वस्त केले व अंमलबजावणीची तात्काळ तयारी दर्शविल्यास पूल बांधकाम प्रकल्प मार्गी लागू शकतो.

प्रकल्पबाधीतास जमीन अधिग्रहणाबाबत व त्याच्या मोबदल्याबाबत मुख्यत्वे (जमिनीच्या बदल्यात जमीन) कागदोपत्री आश्वस्त करणे आवश्यक आहे असाच निष्कर्ष स्थळभेटीवरून निघतो. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ ला जोडणाऱ्या एकूण ३७ किलोमिटर लांबीच्या रस्त्याच्या कामाचे पूर्णत्व मौजे कडगांव, ता. भुदरगड येथील पूलाच्या बांधकामावर निर्भर असून त्याकामी श्री. आत्माराम दत्तात्रय देसाई या शेतकऱ्याची जमीन अधिग्रहित करावी लागणार आहे. प्रस्तुत अधिग्रहणाच्या अभ्यासाकरीता प्राथमिक माहितीचे संकलन व क्षेत्रभेटीतून निम्नउल्लेखित बाबी निदर्शनास आल्या.

I. प्रकल्पबाधन ठिकाणच्या एकूण ९५ आर (२.३७ एकर) जमिनीव्यतिरिक्त प्रस्तुत कुटुंबाकडे एक हंगामी स्वरूपाची दोन भावांच्या नावे मिळून एकूण तीन एकर जिरायत जमीन आहे. प्रस्तुत जमिनीत मिळणारी पिकवार प्रती एकर एकूण उत्पादकता भात - ३०, नाचणी - १२ व भूईमूग - ०८ क्विंटल याप्रमाणे असल्याचे आमच्या निदर्शनास आले.

II. प्रस्तावित रस्ता-पूल बांधणी प्रकल्पाचे काम प्रकल्पबाधीत कुटुंबाच्या गट क्रमांक २५२ (अ) मधील ९५.०० आर क्षेत्रातील १३.०० आर भूखंडाच्या मधोमध होणार असून या भूखंडाचे पूल बांधणीमुळे पुलाखाली जाणाऱ्या अंदाजे ०२.०० आर क्षेत्राव्यतिरिक्त दोन भिन्न तुकड्यांत रूपांतर होणार आहे. पर्यायाने सार्वजनिक बांधकाम खात्याच्या आवश्यकतेनुसार जरी फक्त ०२.०० आर एवढेच क्षेत्र तांत्रिकदृष्ट्या बाधीत अथवा अधिग्रहित होणार असले तरीही या छोट्या जमीन तुकड्याचे पूल बांधकामामुळे पूल संलग्न दोन्ही बाजूस पोटखराब निर्माण होणार असल्यामुळे प्रकल्पबाधीत कुटुंबाचे वास्तव नुकसान तांत्रिक अधिग्रहित जमीन आकारमानापेक्षा अधिक संभवते.

III. उर्वरित जमिनीचा लहान तुकडा कृषी लागवडीकरीता अकिफायतशीर होणार असल्यामुळे भविष्यातील सततची गैरसोय प्रकल्पबाधीत कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या नुकसानकारकच ठरणार आहे. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या ०२.०० आर अधिग्रहणाचा युक्तीवाद प्रकल्पबाधीत कुटुंबाला मात्र अधिक नुकसानकारक असणार यात शंका नाही.

IV. प्रकल्पबाधीत कुटुंबाच्या जमीन अधिग्रहण विषयक दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रस्तुत प्रकल्पबाधीत कुटुंबाची गट क्रमांकान्वये यापूर्वी अनुक्रमे कोल्हापूर बंधारा व स्मशान दहनभूमीकरीताही जमीन अधिग्रहण झालेले आहे. त्यामुळे प्रस्तुत रस्ता-पूल प्रकल्पाकरीता या कुटुंबाच्या २५२ (अ) याच गट क्रमांकावरील जमिनीचे अनुक्रमे तिसरे अधिग्रहण आहे असे नमूद करणे आवश्यक आहे. त्यामुळे जमिनीच्या बदल्यात जमीन अथवा पैशाच्या स्वरूपातील मोबदल्याकरीता वास्तव जमीन बाजारभावाचा विचार करणे अत्यावश्यक आहे.

V. प्रस्तुत रस्ता-पूल बांधणी प्रकल्पात प्रकल्पबाधीत कुटुंबाची एकूण किती जमीन बाधीत होणार अथवा त्याकरीता संबंधित कुटुंबास कशा दराने व

एकूण किती मोबदला मिळणार याविषयी जिल्हा भूमी अधिग्रहण व पुनर्वसन अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अद्याप कोणतीही लेखी सूचना प्रकल्पबाधीताला दिली गेली नाही असेच दिसून येते. किंवा बाधीत जमिनीच्या मोबदल्यात केव्हा, किती व कोठे जमीन देणे प्रस्तावित आहे काय याविषयीही प्रकल्पबाधीत कुटुंबाला अद्याप काहीही लेखी सूचना प्राप्त नाही.

**VI.** मौजे कडगांव, ता. भुदरगड येथील गट क्रमांक २५२ (अ) व २५२ (ब) अशा एकूण ९५.०० आर शेतजमिनीतून प्रस्तावित पूल बांधणीकरीताचे अनुक्रमे तिसरे भूमी अधिग्रहण प्रस्तावि आहे. यापूर्वी अनुक्रमे स्मशान व कोल्हापूर बंधाऱ्यासाठी याच गट क्रमांकाच्या जमिनीतून भूमी अधिग्रहण झालेले आहे. त्यामुळे प्रकल्पबाधीत कुटुंब एक प्रकारच्या मानसिक तणावाखाली असल्याचे दिसून आले.

**VII.** गट क्रमांक २५१ (ब) च्या एकूण १४ आर क्षेत्रापैकी अधिग्रहणशील क्षेत्र प्रस्तुत रस्ता-पूल बांधणीकामी अधिग्रहित करण्याची आवश्यकता आहे. (कार्य अभि/साबावि(दक्षिण)कोल्हापूर/प्रशा/संकीर्ण/३१९९/२०१८/दिनांक ०६/०८/२०१८). परंतु महत्त्वाच मुद्दा असा आहे की प्रकल्पबाधीत क्षेत्राच्या अगदी मधोमध पूल बांधकाम होणार असल्यामुळे अगोदरच लहान असलेल्या धारणक्षेत्राचे दोन अती लहान धारणक्षेत्रात रूपांतर होणार आहे. त्यामुळे दोन बाबी संभवतात. एक; प्रकल्पापोटी भूमिअधिग्रहणामुळे धारणक्षेत्र अघिक लहान होवून लागवडीस अकिफायतशीर होणार आणि दोन; पूल बांधणीनंतर प्रकल्पबाधीत जमीन मालकाला नवनिर्मित पोट खराब्यामुळे तांत्रिक प्रकल्पबाधीत क्षेत्राव्यतिरिक्त अधिकचे नुकसान सहन करावे लागणार आहे. किंबहुना निर्माण होणारा अलागवडक्षम पोटखराबा वास्तव अधिग्रहणापेक्षा अधिक असणार आहे

याची नोंद घेणे आवश्यक आहे. प्रकल्पबाधीत कुटुंबास प्रकल्पाकरीता भूमी अधिग्रहणाविषयी अद्याप कोणतीही लेखी कल्पना देण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रकल्पबाधीत शेतकऱ्याला शासन दरबारी पत्रव्यवहार करण्यासाठी कोणताही संदर्भ उपलब्ध नाही. त्यामुळे प्रकल्पाबाधीताचा प्रकल्पास ''ना विरोध - ना पाठिंबा'' अशी स्थिती निर्माण झाली आहे.

**VIII.** विशेष म्हणजे प्रस्तावित गट क्रमांकावरील भूमी अधिग्रहण सलग तिसरे अधिग्रहण असूनही प्रकल्पबाधीताचा अधिग्रहण अथवा रस्ता-पूल बांधणी प्रकल्पास विरोध नाही हे विशेष मानावे लागेल. अर्थात सार्वजनिक बांधकाम विभागाने मौजे कडगांव येथील स्वत:च्या मालकीच्या भूखंडातून प्रस्तावित अधिग्रहित जमिनीच्या मोबदल्यात जमीन (५ गुंठे) देवू करावी म्हणजे अधिग्रहण अधिक निर्मित पोटखराब्यामुळे होणारे नुकसान भरून निघण्यास मदत होईल. अर्थात प्रकल्पबाधीत शेतकऱ्याचेही असेच म्हणणे आहे असे क्षेत्रभेटीवरून आमच्या लक्षात आले.

**IX.** प्रस्तावित रस्ता-पूल बांधकामाकरीता शिल्लक राहणारी जमीन सार्वजनिक बांधकाम विभागाने अधिग्रहित करावी. कारण प्रकल्पबाधीतास उर्वरित जमिन आर्थिकदृष्ट्या अकिफायतशीर असणार आहे यात शंका नाही.

**X.** रस्त्यानजिक जमिनीचा किमान बाजारभाव चार ते पाच लक्ष प्रति गुंठा आहे. त्यामुळे अधिग्रहित जमिनीस रस्त्यालगतची जमीन असे गृहित धरून त्याप्रमाणे रोख नुकसान भरपाई मिळावी अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या स्वत:च्या मालकीच्या जमिनीतून जमीन स्वरूपात मोबदला दिला जावा.

**XI.** जमिनीच्या बदल्यात जमीन या तत्त्वावर युक्तीवाद करताना प्रकल्पबाधीताचे असे म्हणणे आहे की, मौजे कडगांव येथे सार्वजनिक बांधकाम खात्याची जमीन उपलब्ध आहे. या जमिनीतून नुकसान भरपाईपोटी एकूण पाच गुंठे

जमीन त्यास मिळावी आणि या युक्तीवादात काहीही अतिशयोक्ती वाटत नाही.

प्रस्तुत प्रकल्पबाधीत कुटुंब दोन भावांचे एकत्र कुटुंब आहे. दोन्ही भावांस प्रत्येकी दोन अपत्ये असून ती शिक्षण घेतात व अल्पवयीन आहेत. त्यामुळे प्रकल्पबाधीत कुटुंबतील सदस्यास नोकरी देणे शक्य होणार नाही. परंतु या सर्व अल्पवयीन अपत्यांचा विचार करता जमिनीच्या बदल्यात जमीन असे धोरण अवलंबून मौजे कडगांव येथील सार्वजनिक बांधकाम खात्याच्या मालकीच्या जमिनीतून काही जमीन देवू करणे भविष्यात कुटुंबाला मदतीचे होवू शकते.

# प्रकरण: १
# रस्ते, महामार्ग, पायाभूत सुविधा व भूसंपादन विषयक विवेचन

पूर्वीच्या काळी भारतीय ग्रामीण समाजात शहरी निवासविषयी फारशी आस्था नव्हती. भारतातील शहरीकरणाचा विस्तार, विकास व लोकांची शहरीकरणाविषयीची ओढ हा गेल्या आठ दशकात विकास पावलेला दृष्टिकोन आहे (Janaki Nair, 2015)[१]. यामुळेच सिंगापूरला आशियाची पहिली आधुनिक शहरी संस्कृती संबोधले गेले. शहरीकरणाच्या विस्तार व विकासाने लोकांच्या आधुनिक आशाआकाक्षांना एक प्रकारे वृद्धिंगत करण्याच्या कामी भूमिका बजावली (Burte 2014, Dutton 2015)[२,३]. अलिकडच्या काळात शहरीकरणाबरोबर ज्या पायाभूत सुविधांच्या विस्ताराची निकड भासू लागली त्या प्रमाणात गुंतवणूकही वाढत गेली. जुन्या लहान अथवा मध्यम शहरांचे रूपांतर मोठ्या महानगरात होवू लागले. याचे मुख्य कारण म्हणजे बदलत्या आर्थिक विकासाच्या गतीमुळे शहरी भागात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. पर्यायाने मोठ्या प्रमाणात ग्रामीण-शहरी स्थलांतर झाल्यामुळे शहरांच्या आजूबाजूच्या उपनगरांची निर्मिती आणि त्याबरोबरच झालेल्या औद्योगिक व सेवाक्षेत्राच्या विस्तारामुळे दळणवळणाच्या साधनांचा प्रचंड विस्तार होवू लागला. पर्यायाने पायाभूत सुविधांची एकंदरीत व्याख्याच बदलून गेली. वेगवान दळणवळणाची निकड भासल्यामुळे वाहतूकीची साधने जशी विकसित होत गेली तसे रस्ते आणि इतर प्रकारच्या वाहतूकीचे व दळणवळणाचे जाळेही विस्तारत गेले. या सर्व पार्श्वभूमीतून रस्ते, महामार्ग, रेल्वे व विमानतळांसाठी प्रचंड मोठ्या प्रमाणात जमिनींची आवश्यकता भासू लागली. यातूनच कधी नव्हे ते शेकडो

[1] *Janaki Nair (2015), Indian Urbanism and the Terrain of the Law, Economic and Political Weekly, September 5, 2015, pp. 54-63.*
[2] *Burte, Himanshu (2014), The Smart City card, Economic and Political Weekly, Vol. XXXXI, No. XXXXVI, pp. 23-25.*
[3] *Dutta, Ayona (2015), New Urban Utopias of Post-Colonial India, Entrepreneurial Urbanization in Dholera Smart City, Gujarat, Dialogues in Geography, Vol. V(I), pp.03-22.*

हजारो कोटी रूपये खर्चाचे महामार्ग, रेल्वेमार्ग व विमानतळे निर्माण करण्याच्या विचारांना मूर्त रूप प्राप्त होवू लागले. या कामांच्या पूर्ततेकरीता भांडवल व जमिनीचा प्रश्न महत्त्वाचा वाटला आणि यातूनच जमिनीला आधुनिक काळात भांडवलाचे स्वरूप प्राप्त झाले (Dhanmanjiri Sathe 2015)[४].

आर्थिक उदारीकरणाच्या काळात विकासासाठी चक्रे वेगाने फिरू लागली तशी भांडवल गुंतवणूक आणि त्याकरीता भूमी अधिग्रहणाची प्रक्रियाही वेगाने सुरू झाली. भारतात जमीन अधिग्रहणाचे प्रमुख तीन टप्पे पडतात. पहिला टप्पा ब्रिटिशकालीन भारतात जे विविध प्रकल्प सुरू झाले त्यावेळचे भूमी अधिग्रहण महत्त्वाचे ठरते. यामध्ये प्रामुख्याने धरणे व नवशहरांचा समावेश करावा लागेल. परंतु जमीन अधिग्रहणाच्या प्रत्येक टप्प्यावर शेतकऱ्यांना दोष देण्याची विकृत प्रवृत्ती दिसून आली. असा आरोप झाला की शेतकरी विकास प्रक्रियेत सहभागी होवू इच्छित नाहीत व पर्यायाने दारिद्र्यात राहतात (Hatekar 2003)[५]. भारतात जमीन अधिग्रहणाचा दुसरा टप्पा म्हणून संबोधले जाते तो म्हणजे हरितक्रांतीचा. या काळात मोठमोठ्या सिंचन प्रकल्पांकरीता प्रचंड प्रमाणात जमिनीचे अधिग्रहण झाले. तसेच भारतीय शेतकऱ्यांनी याकरीता आपल्या जमिनी देवून हा आरोपही चुकीचा आहे हे सिद्ध केले (Subramaniam, C. 1979)[६]. कारण प्रत्येक प्रकल्पाकरीता शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी देवू केल्या किंवा तसे करणे त्यांना भाग पडले. यानंतरचा जमीन अधिग्रहणाचा प्रमुख टप्पा म्हणजे १९९१ च्या आर्थिक उदारीकरणानंतरचा कालखंड होय. उदारीकरणोपरांत गेल्या तीन दशकांच्या काळात जमीन अधिग्रहणाचे स्वरूप व आवश्यकता यात प्रचंड बदल व वाढ झाल्याचे दिसून

---

[4] *Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, pp. 52-58.*

[5] *Hatekar, N. (2003), Farmers and Markets in Pre Colonial Deccan: The Plausibility of Economic Growth in Traditional Society, Post and Present, No. 178, pp. 116-147.*

[6] *Subramaniam, C. (1979), The New Strategy in Indian Agriculture: The First Decade and After, New Delhi, Vikas Publishing House.*

यते. या काळात वेगाने वाढणारे शहरीकरण, उपनगरांचा विसतार व रोजगार संधींचे शहरीकरण पर्यायाने ग्रामीण-शहरी स्थलांतर या सर्व घटकांतून निर्माण झाली ती म्हणजे पायाभूत व दळणवळणाच्या क्षेत्रात प्रचंड गुंतवणूक व जमीन अधिग्रहणाची आवश्यकता होय. परंतु या काळात मात्र अगोदरच्या दोन टप्प्यांवरील जमीन अधिग्रहणाप्रमाणे अत्यल्प मोबदला अथवा काही प्रमाणात सक्तीने जमीन अधिग्रहणाची प्रक्रिया राबविणे शक्य होणार नाही हे सरकार व ज्या खाजगी क्षेत्राच्या वतीने सरकार हे काम करत असे अशा खाजगी क्षेत्राचीही खात्री पटली (Dhanmanjiri Sathe 2016)[७]. याची प्रचिती खाजगी औद्योगिक क्षेत्र व लोकनियुक्त लोकशाही सरकारलाही आली. या काळात जमीन अधिग्रहणावरून भारत तसेच इतर आशियायी देश व आफ्रिकी देशांतही अनेक तंटे उद्‌भवले (Cao et.al. 2008, FAO 2009)[८, ९]. भारतातील प्रमुख उदाहरणात पश्चिम बंगालमधील नंदिग्राम, सिंगूर (Maitreesh Ghatak et.al. 2010)[१०] आणि महाराष्ट्रातील नवी मुंबईचा महा मुंबई विशेष आर्थिक क्षेत्र व गोवा विशेष आर्थिक क्षेत्र (Dhanmanjiri Sathe 2016)[११] इत्यादींचा समावेश करावा लागेल. नंदिग्राम सिंगूर जमीन अधिग्रहण प्रकरणामुळे तर पश्चिम बंगालचे मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे तीस वर्षांचे सरकार त्यानंतरच्या सार्वजनिक निवडणुकीत पडले. नागरीकरण, रस्ते, महामार्ग, उपनगरे व औद्योगिकीकरणाकरीता आर्थिक उदारीकरणानंतर जी मोठी जमीन अधिग्रहणे घडून आली त्यास उत्तरप्रदेशमधील नोयडा, कर्नाटकातील म्हैसूर-बेंगलोर कॉरीडॉर,

---

[7]*Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, pp. 52-58.*

[8]*Cao, Guangzhong, Changchun Feng, Ran Tao (2008), Local Land Finance in China's Urban Expansion: Challenges and Solutions, China and World Economy, 16(2), 19-30.*

[9]*FAO (2009), Land Grab and Development Opportunities? Agricultural Investments and International land Deals in Africa, FAO-IFAD Report.*

[10]*Ghatak, Maitreesh and Parikshit Ghosh (2011), The Land Acquisition Bill: A Critique and a Proposal, Economic and Political Weekly, October 8, 2011, Vol. XLVI, No. XXXXI.*

[11]*Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, pp. 52-58.*

महाराष्ट्रातील अनेक विमानतळे, तामिळनाडूमधील मद्रास शहरातील आडियारचे विशेष आर्थिक क्षेत्र इत्यादींचा उल्लेख करता येवू शकतो. तुलनात्मक विचार केला तर आंध्रप्रदेश, हरियाणा, कर्नाटक, तामिळनाडू व गुजरात इत्यादी राज्यात जमीन अधिग्रहणास शेतकऱ्यांचा फारसा विरोध झाला नाही असे दिसून येते (Jenkin, Kennedy and Mukhopadhyay 2014)[१२]. परंतु ओरीसा, पश्चिम बंगाल इत्यादी राज्यांत मात्र जमीन अधिग्रहण ही निश्चितच सोपी बाब नाही असे परिस्थितीजन्यतेवरून सिद्ध झाले आहे. शेतकऱ्यांचा जमीन अधिग्रहणास विरोध आहे असे अगदी सर्वदूर सत्य मानने निश्चितच चुकीचे आहे. कारण शेतकरी जर त्यांच्या जमिनीचा योग्य मोबदला मिळणार असेल व त्यांचे योग्य पुनर्वसन होणार असेल तर प्रकल्पाकरीता निश्चितपणे जमीन देण्यास तयार असतात. अर्थात राष्ट्रीय नमुना पाहणी (NSSO 2005)[१३] २००५ च्या अहवालानुसार एकूण ४० टक्के शेतकऱ्यांना शेती व्यवसाय नकोसा झालेला आहेच. या प्रमाणात नंतरच्या काळात वाढसुद्धा झाली असणार (Dhanmanjiri Sathe 2016)[१४]. याचे प्रमुख कारण कृषी क्षेत्रावरील संकटात सापडते. अशावेळी शेतकऱ्यांना जर जमिनीच्या मोबदल्यात योग्य रक्कम अथवा पर्यायी जमीन आणि रोजगाराच्या संधी निर्माण करून दिल्या तर ते निश्चितपणे आपली शेतजमीन देण्यास तयार होतात असेही दिसून आले आहे. अर्थात चीन व मेक्सिको सरकारांनी गेल्या दोन दशकात ज्याप्रमाणे सात कोटी शेतकऱ्यांना आपल्या जमिनींचा सक्तीने त्याग करणे भाग पाडले अशा प्रकारचे औद्योगिकीकरण व आर्थिक विकासाचे प्रमेय भारतात राबवणे शक्य नाही. आंध्र प्रदेशच्या तेलंगणा व आंध्र प्रदेश अशा विभाजनानंतर अमरावती या ठिकाणच्या जमिनी आंध्र प्रदेशची नवीन राजधानी निर्माण करण्यासाठी सरकारने अधिग्रहित केल्या.

---

[12] *Jenkins, R. L. Kennedy and Mukhopadhyay (Eds) (2014), Power, Policy and Protest: The Politics of India's Special Economic Zones, New Delhi, Oxford University Press.*

[13] Govt of India (2005), National Sample Survey Organization, New Delhi

[14] *Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, pp. 52-58.*

अधिग्रहित जमिनींच्या मोबदल्याव्यतिरिक्त ३० टक्के विकसित जमीन मूळ मालकांना परत देण्याचे धोरण अवलंबिले. तसेच प्रती एकर जमिनीकरीता दरवर्षी रूपये पन्नास हजार असे दहा वर्षाकरीता देवू केले की त्यामुळे अधिग्रहण मोबदल्याव्यतिरिक्त शेतकऱ्यांचे अधिग्रहित जमिनीतून मिळणारे उत्पन्नही सुरू राहू शकेल. कोणत्याही प्रकल्पाकरीता जमीन अधिग्रहणास शेतकऱ्यांचा जो विरोध असतो त्याचे प्रमुख कारण म्हणजे नवीन प्रकल्पातील एकूण भांडवली गुंतवणूकीत न्यूनतम जमिनीचे मूल्य (सन २००४ मध्ये केवळ १.८ टक्के एवढेच होते. सन २००८ मध्ये त्यात वाढ होवून २.९ टक्के इतके झाले) (Kakani R. K., T. L. Ranga Ran and Tigga and Nutan Singh 2008)[१५]. अशा प्रकारच्या न्यून मूल्य धोरणामुळे शेतकऱ्यांचा जमिन अधिग्रहणास विरोध असतो हे प्रामुख्याने समजून घेणे आवश्यक आहे. जमीन अधिग्रहणास शेतकऱ्यांचा विरोध असण्याचे आणखी महत्त्वाचे कारण म्हणजे संबंधित व त्या आजूबाजूच्या जमिनींचे प्रकल्पोपरांत होणारे मूल्य भांडवलीकरण होय (Value Capitalization). कारण जमीन अधिग्रहण करताना जरी संबंधित जमिनीची किंमत कमी असली तरी प्रकल्पपूर्तीनंतर त्या जमिनीच्या व आजूबाजूच्या जमिनींच्या किंमती अनेकपट वाढतात. आणि अशा जमीन मूल्य भांडवलीकरणाचा फायदा मूळ जमीन मालकास मात्र होत नाही.

### १.१: महामार्ग प्रकल्प कामी प्रसंगी अतिरिक्त जमीन अधिग्रहण:

अनेक रस्ते किंवा महामार्गांची लांबी शेकडो किलोमिटर व रूंदीही प्रचंड असते. पर्यायाने हजारो एकर जमिनीची आवश्यकता भासते. कारण असे महामार्ग अनेक जिल्हे अथवा प्रसंगी विविध राज्यांना जोडणारे तसेच अनेक पदरी वाहतुकीची क्षमता असणारे असतात. देशातील याची प्रमुख उदाहरणे म्हणजे कर्नाटकातील म्हैसूर-बेंगलोर कॉरीडॉर, महाराष्ट्रातील पुणे-मुंबई एक्सप्रेस महामार्ग, मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग इत्यादी

[15] *Kakani, R. K., T. L Ranga Ran and Tigga and Nutan Singh (2008), Insights into Land Acquisition Experiences of Private Business in India, Working Paper 08-11, Jamshedpur, XLRI School of Business and Human Resources.*

आहेत. विशेष म्हणजे अशा महामार्ग प्रकल्पांकरीता अधिग्रहित करावयाच्या जमिनीत नवशहरे, उपनगरे व इतर सुविधांकरीताच्या जमीन अधिग्रहणाचाही समावेश केला जातो. उदाहरणार्थ मुंबई-नागपूरला जोडणारा समृद्धी महामार्ग एकूण ७०० किलोमिटर लांबीचा असून त्याकरीता लागणारी एकूण जमिनीची आवश्यकता ८४०० हेक्टर इतकी आहे (१२००० एकर). तर महामार्गालगत विकसित करावयाच्या सोयीसुविधा व पायाभूत सुविधांकरीता अधिक १६०० हेक्टर (४००० एकर) इतकी जमीन अधिग्रहित केली जाणार आहे. म्हणजेच प्रस्तुत प्रकल्पाची एकूण जमीन आवश्यकता दहा हजार हेक्टर म्हणजे पंचवीस हजार एकर इतकी प्रचंड आहे. अशा प्रचंड आवश्यकतेमुळे प्रकल्पपूर्तीस विलंब होवून मूळचा प्रकल्पव्यय ४६,००० कोटी रूपये वरून ५६,००० कोटी रूपये इतका वाढला आहे. कर्नाटकातील म्हैसूर-बेंगलोर कॉरीडॉरसाठीही एकूण ६९९९ हेक्टर (१७४९७.५ एकर) इतक्या जमिनीची आवश्यकता होती. परंतु रस्ता बांधकामाव्यतिरिक्त इतर सुविधा निर्माण करण्याचेही नियोजन केले गेले व एकूण जमिनीची आवश्यकता वाढली (Janaki Nair 2015)[१६]. अशा प्रकारच्या अतिरिक्त अधिग्रहणास शेतकऱ्यांचा विरोध असतो. कारण या अतिरिक्त सोयीसुविधा व नवीन शहरीकरणाचा व्यापारी लाभ मात्र प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना मिळत नाही. तसेच उपरोल्लेख केल्याप्रमाणे प्रकल्पोपरांत जमीन मूल्य भांडवलीकरणाच्या लाभापासूनही मूळ प्रकल्पबाधीत जमीन मालक वंचित राहतात. याकामी नव आंध्रप्रदेशचे अमरावती येथील राजधानी प्रमेय अधिक आवश्वासक व आदर्श ठरते.

### १.२: सरकारकरीता धडा:

स्वातंत्र्यपूर्व ब्रिटिशकालीन अथवा स्वातंत्र्योत्तर पहिल्या टप्प्यात झालेल्या जमीन अधिग्रहणाप्रमाणे अत्यल्प किंमतीस जमीन अधिग्रहण करून प्रकल्पपूर्ती करणे शक्य राहिले नाही. किंबहुना काही प्रमाणात सक्ती करून भूमी अधिग्रहण केले तर लोकशाही

[16] *Janaki Nair (2015), India Urbanization and the Terrain of the Law, Economic and Political Weekly, September 5, 2015, PP. 54-63.*

राज्यव्यवस्थेत पश्चिम बंगालप्रमाणे तीस वर्षे सत्तेवर असलेले सरकारही निवडणुकीत हार खावून सत्ताच्यूत होवू शकते. परिणामे संबंधित राज्य सरकार व राजकीय पक्ष जमीन दलाल ठरण्याची शक्यता असते. म्हणूनच लोकशाही शासन व्यवस्थेत कोणत्याच राजकीय पक्षाला असे सक्तीचे अधिग्रहण धोरण अवलंबिणे शक्य नाही. किंबहुना गुजरातप्रमाणे शेतकऱ्यांकडून अधिक किंमतीस जमिनी अधिग्रहित करून उद्योजकांना कमी किंमतीत देवू करणे व झालेला तोटा राजकोषीय तरतुदीतून भरून काढण्याचेही धोरण काहीवेळा अवलंबिले जाते. यामुळे सर्वच राजकीय पक्ष व राज्य अथवा केंद्र सरकारांना आपण शेतकऱ्यांच्या बाजूचे आहोत हे सिद्ध करण्याची आवश्यकता निर्माण झाली. यातूनच २०१३ चा नवीन जमीन अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायद्याचा उदय झाला. या कायद्याला तेंव्हा विरोधी पक्षात असलेल्या सर्व पक्षांनीही पाठिंबा दिला होता. नंतर मात्र २०१४ मध्ये नवीन सरकारने कायदा बदलण्याचा प्रयत्न केला. परंतु ते शक्य झाले नाही. लोकसभेत पाठिंबा मिळू शकला नाही. पर्यायाने नोव्हेंबर २०१५ मध्ये बिहार विधानसभेची निवडणूक आल्याने केंद्र सरकारने ऑगस्ट २०१५ मध्ये आपला स्वत:चा अध्यादेश नैसर्गिकरित्या मृत होवून देण्याचे धोरण अंगिकारले.

एकंदरीत काय तर जमीन दलाल अशी भूमिका घेवून विकास धोरण राबविणे शक्य नाही. शेतकरी आपली जमीन प्रकल्पकामी देण्यास तयारही असतात. परंतु त्यांना योग्य तो मोबदला व रोजगाराच्या संधी देवून विकास प्रक्रियेत भागीदार करून घेणे आवश्यक आहे. आर्थिक सुधारणोपरांत तीन दशकांच्या काळात असे अनेक अनुभव आले. जमीन अधिग्रहण हा विकास प्रक्रियेतील एक महत्त्वाचा घटक समोर आला. यातूनच २०१३ च्या नवीन अधिग्रहण कायद्याचा उदय झाला.

### १.३: न्याय्य विस्थापन आणि पुनर्वसनाच्या दिशेने:

बहुउद्देशीय नदी प्रकल्प, विशेष आर्थिक क्षेत्रे, उपनगरे, रस्ते व महामार्ग, मेट्रो रेल्वे इतयादीकरीता मोठ्या प्रमाणात जमिनीची व पर्यायाने अधिग्रहणाची आवश्यकता भासते. त्यामुळे विस्थापन व पुनर्वसनाचे नियोजन ही एक मोठी समस्या बनली आहे. भूमी

अधिग्रहणात फक्त शेतकऱ्यांच्या खाजगी मालकीच्या जमिनीचांच समावेश नसतो तर केंद्र व राज्य सरकारच्या विविध विभागांच्याही जमिनींचे कित्येकदा अधिग्रहण करावे लागते. त्याकरीता प्रत्येक विभागाची उद्दिष्टे व जबाबदाऱ्या भिन्न असल्यामुळे एक विभाग दुसऱ्या विभागास प्रकल्पपूर्तीकामी आवश्यक भूमी अधिग्रहणाकरीता सहकार्य करेलच असे नाही. वन विभागाचे उदाहरण याबाबतीत महत्त्वाचे ठरते. इतर सरकारी विभागांच्या प्रकल्पपूर्तीकरीता जर वन विभागाची जमीन अधिग्रहित करावी लागणार असेल तर त्या बदल्यात इतर ठिकाणची म्हणजे प्रकल्प विभागाच्या अथवा राज्य सरकारच्या ताब्यातील वन जमिनीच वन विभागाला पर्याय म्हणून देवू कराव्या लागतात. स्वातंत्र्यापूर्वी ब्रिटिश व स्वातंत्र्यानंतर भारत सरकारने जलसिंचन, औद्योगिकीकरण, शहरीकरण, संरक्षण विभाग, रेल्वे इत्यादीकरीता अनेकदा भूमी अधिग्रहण केले. परंतु मूळ मालक असलेल्या शेतकऱ्यांच्या पुनर्वसनाचा प्रश्न बहुतांश प्रकल्पांच्या बाबतीत अनुत्तरीतच राहिला. अशा पूर्व अनुभवांमुळे आणि कृषी क्षेत्रासमोरील इतर समस्यांमुळे भारतात विविध शेतकरी चळवळी उभ्या राहून त्यांनी सरकारसमोर आपले म्हणणे मांडण्यास व प्रसंगी आंदोलनाची तयारी करण्यास प्रारंभ केला. यातूनच नंतरच्या काळात आदर्श पुनर्वसन व अधिग्रहण आणि अधिग्रहित जमिनीच्या मोबदल्याची समस्या अधिक तीव्र स्वरूप धारण करू लागली. प्रकल्पबाधीतांच्या रोजगार समस्येची जाणीव पूर्वी सरकारला नव्हती असेच काहीसे झाले. किंबहुना त्याबाबत एकदंरीतच प्रशासकीय अनास्था दिसून आली. त्यामुळे नंतरच्या प्रकल्पबाधीतांनी रोजगार, मोबदला, पुनर्वसन व समस्येकडे अंगुलीनिर्देश करून सरकारला विचार करण्यास भाग पाडले. अनेकदा तर जलसिंचन प्रकल्प आणि औद्योगिकरणाकरीता भूमी अधिग्रहण केलेल्या प्रकल्पबाधीतांना मूलभूत रोजगाराच्या संधी अथवा पर्यायी जमिनी न मिळाल्याने प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांना स्थलांतर करून शहरी झोपडपट्टी व दारिद्र्याचे जीवन जगावे लागले. १९५७ साली पूर्ण केलेल्या कोयना धरणाच्या प्रकल्पबाधीतांचा अनुभव याबाबत अत्यंत विदारक आहे. कारण अद्यापही कोयना धरणग्रस्तांपैकी काहींचे पुनर्वसन बाकी आहे. पर्यायाने

सरकारला न्याय्य विस्थापन व पुनर्वसन धोरणाचा मसुदा तयार करण्याची निकड भासली. साधारणपणे १९८० च्या दशकात भारत सरकारने सर्व प्रकल्पबाधीतांच्या न्याय्य पुनर्वसनाकरीता विचार करणे सुरू केले. या विषयावर अनेकवेळा मंत्रीमंडळ व सार्वजनिक पातळीवर चर्चा झाल्या (Ramaswami Iyer 2007)[१७]. तसेच याकरीता मंत्रीगटाची स्थापना करून विचारविनिमय घडवून आणला (Ramaswami Iyer 2007)[१८]. तब्बल दोन दशके चर्चा व मसुदा आणि पुनर्मसुदा तयार करण्यात गेली. परंतु योग्य मार्ग निघू शकला नाही. पर्यायाने मसुदा तयार होण्यात दिरंगाई झाली. शेवटी ऑक्टोबर २००६ मध्ये ''राष्ट्रीय पुनर्वसन धोरण २००६'' चा मसुदा चर्चेकरीता समोर आला. त्यानंतर आलेल्या सूचनांची दखल घेवून भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालयाने शेवटी राष्ट्रीय पुनर्वसन कायद्याचा मसुदा तयार करण्याचे काम हाती घेतले. यातूनच नंतर ''नॅशनल रिहॅबिलिटेशन ॲन्ड रिसेटलमेंट पॉलिसी २००७'' चा अंतिम मसुदा तयार झाला (Walter Fernandez 2004)[१९]. तद्नंतर पुढे ७ सप्टेंबर २०११ रोजी नवीन भूमी अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनर्निवास कायद्याचा मसुदा लोकसभेत मांडला गेला. एकूण २३५ सदस्यांपैकी २१६ सदस्यांनी मसुद्याच्या बाजूने तर १९ सदस्यांनी विरोधात मतदान केल्याने मसुदा एकमताने मंजूर झाला. दिनांक २९ ऑगस्ट २०१३ रोजी मसुदा लोकसभेत तर दिनांक ४ सप्टेंबर २०१३ रोजी राज्यसभेत पारित झाल्याने दिनांक २७ सप्टेंबर २०१३ रोजी राष्ट्रपतींनी त्यावर सही केली आणि दिनांक १ जानेवारी २०१४ रोजी कायदा अस्तित्वात येवून त्याची अंमलबजावणी सुरू झाली. प्रस्तुत कायदा पारित होवून प्रत्यक्ष अंमलात येईपर्यंत देशात सार्वजनिक अथवा सरकारला सामाजिक व आर्थिक दृष्टीने लोककल्याणकारी वाटणाऱ्या खाजगी व

---

[17] *Ramaswamy Iyer (2007), Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, July 28, 2007, pp. 3103.*

[18] *Ramaswamy Iyer (2007), Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, July 28, 2007, pp. 3103.*

[19] *Walter Fernandez (2004), Rehabilitation Policy for the Displaced, Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, March 20, 2004, pp. 1191.*

सार्वजनिक अशा दोन्ही प्रकारच्या प्रकल्पांकरीता ब्रिटिश पारीत १८९४ च्या कायद्याअंतर्गतच जमिनीचे अधिग्रहण करण्याची तरतूद अंमलात आणली जात असे. परंतु १८९४ च्या कायद्या अंतर्गत प्रकल्पबाधीतांच्या पुनर्वसनाची कोणतीही जबाबदारी सरकारवर असत नव्हती. कारण १८९४ च्या ब्रिटिश कायद्यात भूमी अधिग्रहित प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन व पुनरस्थैर्याच्या बाबतीत जबाबदारीचे उत्तरदायीत्व सरकारवर नव्हते. किंबहुना सरकारने असे उत्तरदायीत्व टाळले होते. परंतु अशा उत्तरदायीत्वाची जबाबदारी २०१३ च्या राष्ट्रीय पुनर्वसन धोरणामुळे व नवीन कायद्याने सरकारवर व पर्यायाने प्रकल्प विभागावर आली. इतकेच नव्हे तर या धोरणाअंतर्गत प्रकल्पबाधीतांना पुनर्वसनाबरोबरच योग्य मोबदला देण्याची जबाबदारी संबंधित राज्य अथवा केंद्र सरकारच्या प्रकल्प विभागावर देण्यात आली. तसेच या कायद्यामुळे भूमी अधिग्रहण आणि प्रकल्पबाधीत संसाधनांच्या मोबदल्याच्या बाबतीत पारदर्शकतेचा आग्रह धरण्यात आला हे विशेष.

प्रस्तुत कायद्यात विस्थापितांच्या पुनर्वसनाकरीता संबंधित प्रकल्प विभागाने मध्यस्थाची (Ambudsman) नेमणूक करणे बांधनकारक करण्यात आले. परंतु या कायद्याअंतर्गत प्रकल्पग्रस्तांना न्यायालयीन प्रक्रियेत जाण्याकरीता फारशी संधी उपलब्ध नसल्याने त्यांचे सरकारवरचे अवलंबित्व अधिक राहते. तथापि प्रस्तुत कायद्याच्या आधीन राहून महाराष्ट्र शासनाने भूमी अधिग्रहण व पुनर्वसनकामी सकारात्मक भूमिका घेवून प्रकल्प विस्थापितांना मोबदला व पुनर्वसन आणि पुनर्निवासाकरीता विशेष प्रयत्न करण्याचे आरंभिले नक्कीच. प्रकल्पग्रस्तांना मोबदला देताना जमिनीच्या वर्तमान बाजारमूल्याच्या चारपट किंमत व पुनर्निवासाकरीता भूखंड तसेच शक्य असेल तेथे प्रकल्पग्रस्तांच्या जमिनीच्या मोबदल्यात जमीन उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातो हे विशेष.

कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड व आजरा तालुक्यातील एकूण दहा गावांना जोडून पुढे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ ला जोडणारा एकूण ३७ किलोमिटरचा रस्ता मौजे कडगांव येथील पूलबांधणीच्या जमीन संपादनातील अडचणीमुळे प्रलंबित आहे. संपादित

करावयाच्या जमीन मालकास अद्याप कोणतीही लेखी सूचना न देता सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडून केवळ तोंडी कल्पना देण्याची भूमिका स्विकारल्यामुळे प्रकल्पबाधीत शेतकऱ्याच्या मनात संभ्रम निर्माण झाला असल्याचे दिसून आले. यापूर्वीच उल्लेख केल्याप्रमाणे प्रस्तावित अधिग्रहित जमिनीवरील प्रस्तुत प्रकल्पकामी होणारे हे सलग तिसरे अधिग्रहण असल्यामुळे प्रकल्पबाधीत शेतकरी कुटुंब अधिकच अडचणीत असल्याचे प्रकल्प स्थळभेटीवरून लक्षात आले आणि याकामी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांची भूमिका असमाधानकारकच असल्याचे निष्पन्न होत आहे.

उपरोल्लेख केल्याप्रमाणे लाभक्षेत्रात सर्वांगिण संक्रमण होवून अपेक्षित विकासाच्या संधी दीर्घकाळ पुढे ढकलल्या जातात किंवा कायमस्वरूपी गमवाव्या लागतात. प्रकल्प दिरंगाईच्या समस्या व्ययवृद्धी अथवा विकास दिरंगाई इतक्याच सीमित नसतात तर अशा दिरंगाईमुळे प्रकल्पबाधीतांच्याही जीवन विकासात अडथळे निर्माण होतात. कारण अधिग्रहणाची घोषणा झाल्यानंतर संबंधित प्रकल्पबाधीतांची गुंतवणूक व कृषी सुधारणा क्षमता आपोआप कुंठीत होऊन संपुष्टात येते. सरकारवरही व्ययवृद्धीचा ताण येतो. इतकेच नव्हे तर यामुळे इतर प्रकल्पाकरीताच्या गुंतवणूकीवरही त्याचा दूरगामी परिणाम होतच असतो. या व इतर बाबी लक्षात घेवून प्रस्तुत प्रलंबित रस्ता-पूल प्रकल्पाचा सामाजिक परिणाम अभ्यास शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र विभागामार्फत पूर्ण केला असून अहवालात भविष्यातील अशा सर्व घटकांचा साकल्याने विचार व अभ्यास करून प्रस्तुत प्रकल्प अहवाल तयार करण्याचा प्रयत्न आमच्यामार्फत केला आहे.

# प्रकरण: २
# माहिती संकलन व अभ्यास कार्यपद्धती

**प्रास्ताविक:**

प्रस्तुत अहवालाच्या प्रकरण क्रमांक ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे भुदरगड तालुक्यातील एकूण दहा गावांतून जाणारा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ ला जोडणारा रस्ता व मुख्यत्वे मौजे कडगांव येथे पूल बांधकाम गेली काही वर्षे प्रलंबित आहे. त्यामुळे प्रकल्पव्ययात वृद्धी होवून एकूण खर्चातही वाढ झालेली आहे. प्रस्तुत प्रकल्प विलंबाचे महत्त्वााचे कारण म्हणजे भूमी अधिग्रहण व जमीन मोबदल्यासंबंधी निर्माण झालेली तेढ होय. याच प्रमुख समस्येचा अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत प्रकल्पाचा सामाजिक परिणाम अभ्यास हाती घेतला असून प्रस्तुत अभ्यास मुख्यत्वे खाली नमूद केलेल्या उद्दिष्टपूर्तीवर निर्भर आहे.





## २.१ अभ्यासाची उद्दिष्टे:

प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल खाली नमूद केलेल्या उद्दिष्टांवर आधारित आहे.

- प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक परिणाम अभ्यासणे.

- प्रकल्पबाधीत व लाभधारकांवरील संभाव्य आर्थिक व सामाजिक परिणामांची चिकित्सा करणे.
- प्रकल्पबाधीत व लाभधारकांवरील संभाव्य संधी व व्यय तसेच त्याग या घटकांची चिकित्सा करणे.
- डिसेंबर २०१३ च्या भूमी अधिग्रहण, पुनर्वसन आणि पुनर्निवास तसेच प्रकल्पबाधीतांच्या अधिग्रहित जमिनींच्या मोबदल्याविषयीची चिकित्सा करणे.
- प्रकल्पबाधीत जमिनीच्या बदल्यात जमीन देवू करणे शक्य आहे काय याविषयीची पडताळणी करणे.
- प्रकल्पबाधीतांवरील आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक परिणाम अभ्यासणे.
- भूमी अधिग्रहण व जमीन मोबदल्याविषयीचा आढावा घेणे.





## २.२: अभ्यास पद्धती:

वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी प्राथमिक व द्वितीय स्त्रोतांद्वारे माहितीचे संकलन, पृथक्करण व विश्लेषण करून अहवाल तयार करण्यात आला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील भुदरगड तालुक्यातील मौजे कडगांव येथील प्रभावित कुटुंबाचा योग्य रचना केलेल्या मुलाखत अनुसूचीद्वारे अभ्यास केला. प्रकल्पबाधीत जमीन किंवा इतर हानी झाल्यास प्रत्यक्ष व अप्रत्यक्षपणे प्रकल्पबाधीत झालेल्या कुटुंबावर त्याचा परिणाम शोधण्यासाठी संबंधित कुटुंबाचे प्रश्नावली व स्थळभेट आणि चर्चेद्वारा सर्वेक्षण करण्यात आले.

## २.३: अभ्यासाची पूर्वपिठीका:

प्रस्तुत अभ्यासाकरीता प्रकल्पबाधीत कुटुंबाची भूमी अभिलेख व क्षेत्रीय तपासणीवर आधारित अचूकपणे सत्याधारित प्राथमिक माहिती संकलित केली. प्रकल्पबाधीत क्षेत्राचा, कुटुंबाचा सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक संदर्भ ओळखण्यासाठी अभ्यासगटाने प्रत्यक्ष क्षेत्रभेटीवर आधारित खुल्या वातावरणात समूह चर्चा घडवून आणल्या. क्षेत्रभेटीद्वारा संकलित माहितीवर आणि प्रकल्पग्रस्तांबरोबर अधिकची सल्लामसलत करून प्रकल्पाच्या सकारात्मक व नकारात्मक सामाजिक व आर्थिक परिणामांची व्याप्ती आणि तीव्रतेचे मूल्यांकन केले. अधिग्रहित जमिनीच्या मोबदल्याविषयी वास्तव आकलन व जाणकारी करून घेतली. तसेच सामाजिक प्रभाव व्यवस्थापन योजनेत समाविष्ट करण्यासाठी उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे. प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक व्यय आणि लाभ तसेच जमीन गमावणाऱ्या कुटुंबाच्या उत्पन्न घटीचा धोका आणि अशा प्रस्तावित प्रकल्पबाधीत कुटुंबास आदर्श जमीन मोबदल्याविषयी उभयपक्षी स्वीकारार्ह योजना तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. मौजे कडगांव येथील प्रकल्पबाधीत कुटुंबासोबत प्रत्यक्षपणे चर्चा दिनांक १७/१८.१२.२०१८ व १७.०२.२०१९ रोजी आयोजित केली होती. या बैठकीत प्रकल्पबाधीत क्षेत्रातील सापनिचे (यानंतर सामाजिक परिणाम निर्धारण असे वाचावे) मुख्य निष्कर्ष तसेच अंतिम

निष्कर्ष, अतिरिक्त माहिती आणि अंतिम सापनि अहवाल इत्यादी विषयावर विचार करण्याबाबत विचारविमर्ष केला गेला. प्रकल्पबाधीत कुटुंबाबरोबरच्या चर्चेचा तपशील (व्हिडिओ, छायाचित्रे इत्यादी बाबी) सदर अहवालात आवश्यक तेथे विश्लेषणासह सादर केले आहे.

## २.४: सामाजिक परिणाम अहवाल साधने आणि पद्धती:

### २.४.१: सामाजिक परिणाम निर्धारण प्रक्रिया:

प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवालात भुदरगड तालुक्यातून दहा गावांना छेदून जाणाऱ्या प्रलंबित राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ ला जोडणारा ३७ किलोमिटरचा रस्ता व पूलाच्या प्रकल्पाबाबत अपेक्षित असलेला सकारात्मक व नकारात्मक बदल तसेच प्रकल्पाचा सामाजिक व आर्थिक परिणाम समजणे, मोजणे आणि त्याकरीता संवाद साधने अत्यंत आवश्यक होते. सामाजिक व आर्थिक नुकसानीचे मोजमाप करण्यासाठी खालील पद्धतीचा वापर करण्यात आला. अपेक्षित, सुयोग्य, सत्याधारित व पृथक्करणक्षम माहिती संकलनाकरीता अभ्यासगटासमोर खाली नमूद केलेले प्रमुख प्रश्न होते;

१. कुणाकडून कोणत्या घटकांविषयी माहिती संकलित करावी?

२. अपेक्षित माहिती संकलन कसे साध्य करावे?

३. नेमकी कोणत्या प्रकारची माहिती संकलन करणे आवश्यक आहे?

४. संबंधित माहिती संकलन सुयोग्य व अचूकपणे कसे करता येईल?

५. संकलित माहितीच्या सहाय्याने अचूक प्रकल्प परिणाम कसे निश्चित केले जावू शकतात?

६. प्रलंबित प्रकल्पाचे अचूक परिणाम दर्शविणारी माहिती म्हणजे नेमकी कोणती माहिती व आकडेवारी असू शकेल?

७. संकलित माहितीचे पृथक्करण व विश्लेषण करण्याचा अचूक व सुयोग्य मार्ग अथवा पद्धती कोणत्या असू शकतात?

८. प्रकल्पबाधीतांबरोबरील संवादातून नेमके काय साध्य होणार?

९. संकलित माहिती व आकडेवारीतून निष्पन्न होणारे निष्कर्ष नेमके कोणत्या उद्दिष्टांची पूर्तता करू शकणारे असतील? .......इत्यादी

**२.५: सापनि अभ्यास पद्धतीतील टप्पे:**

अभ्यासगटाने मौजे कडगांव व इतर नऊ गावांना जोडणारा रस्ता व पूलासंबंधी प्रकल्पासाठी सामाजिक परिणाम मूल्यांकनाची योजना आखत असताना सर्वेक्षण मनुष्यबळ निवड आणि प्रशिक्षणामध्ये गुणवत्ता वेळ खर्च केला आहे. सुरूवातीस सर्वेक्षणाचा हेतू मूल्यांकन एकक, उपलब्ध वेळ, पुढील कामाचे नियोजन आणि इतर संबंधित समस्यांबद्दल जाणून घेणे आवश्यक होते. तद्नुषंगाने सापनि अभ्यासगटाने कडगांव रस्ता व पूलबांधणी प्रकल्पाचे ता. भुदरगड, जिल्हा कोल्हापूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता व इतर अधिकारी-कर्मचारी आणि महसूल अधिकारी यांच्यासोबत चर्चा केली. अशी चर्चा केल्यानंतर लक्षात आले की संबंधित कायदे व नियमांनुसार सापनि प्रक्रियेत मूलभूतपणे तीन घटकांचा समावेश करणे अत्यावश्यक आहे. ते तीन घटक पुढीलप्रमाणे;

१. प्रकल्पबाधीतांवर नकारात्मक परिणाम होऊ शकतात अशा सामाजिक-आर्थिक परिस्थितीचे सविस्तर मूल्यांकन करण्याची आवश्यकता.

२. दुर्बल घटक जसे की महिला, मुले व वयस्क यांचेवर होणारा परिणाम आणि प्रकल्पबाधीत व स्थावर विस्थापन जसे की घर, वृक्षसंपदा, निवारा, जैवनैसर्गिक घटक पशुपक्षी आणि वनसंपदेचे स्खलन व नाश इत्यादी परिणामांचा सविस्तर अभ्यास आणि.....

३. तद्नुषंगिक किमान अनिष्ट परिणामांसाठी सुयोग्य आर्थिक नुकसान भरपाई विषयक विस्तृत योजना सुचविणे.

## २.६: प्रकल्प प्रभाव क्षेत्राची पार्श्वभूमी:

प्रस्तुत मौजे कडगांव व इतर नऊ गावांना स्पर्श करून जाणारा रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ ला जोडणारा असून रस्ता व पूलाच्या कामात मौजे कडगांव गावातील शेतकऱ्याची जमीन अधिग्रहित होणार आहे. परंतु लोकवस्ती मात्र अबाधित राहते. वास्तव स्थितीच्या अवलोकनासाठी प्रारंभिक क्षेत्रभेट आयोजित केली आणि क्षेत्र सर्वेक्षण करून अभ्यासगटाने क्षेत्रे, झाडे, सामाजिक व आर्थिक आणि सांस्कृतिक मूलभूत संरचना आणि लोकवस्तीच्या भौगोलिक मर्यादांची चांगल्या प्रकारे माहिती घेतली.

### २.६.१: बहुविध स्त्रोत माहिती संकलन:

यानंतरच्या टप्प्यात सापनि अभ्यासगटाने कोल्हापूर जिल्हा सार्वजनिक बांधकाम व महसूल विभागाकडून प्रस्तुत प्रकल्पासाठी अधिग्रहित करू इच्छित जमिनीची माहिती संकलित केली. एकत्रित केलेल्या आकडेवारीची पडताळणी करून प्रकल्पाशी निगडित आवश्यक त्या सर्व माहितीचा आढावा घेतला. प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल तयार करण्यासाठी उपरोल्लेखित गाव व शेतकऱ्याची किती जमीन प्रकल्पबाधीत होते व प्रस्तुत अधिग्रहित जमिनीच्या मोबदल्यात कशा प्रकारे सुयोग्य मोबदला देता येईल याकरीताचे अवलोकन करण्याचा प्रयत्न केला. तसेच लाभार्थी गावनिहाय सांख्यिकीय आढावा घेतला. तसेच प्रस्तुत प्रकल्पबाधीत कुटुंबाचे सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक आकलन करून घेवून कुटुंबाविषयी इतर सर्व बाबी जाणून घेतल्या. अन्य माहिती संकलन कामी दुय्यम स्त्रोत माहितीचा वापर करण्यात आला तसेच प्रकल्पबाधीत व प्रकल्प लाभधारक अशा दोन्ही प्रकारच्या गावांचे मूलभूत सुविधांविषयीही सर्वेक्षण

करून प्रकल्प, व्यय व लाभविषयक तसेच प्रकल्प आवश्यकतेचे आकलन करून घेण्याचा प्रयत्न केला.

### २.६.२: प्रकल्पबाधीत, प्रतिगामी-अवगामी भागधारक आणि नियंत्रण समूह:

सापनि अभ्यासगटाने उपरोल्लेखित प्रकल्पबाधीत शेतकरी आणि प्रतिगामी - अवगामी भागधारक इत्यादी घटकांकडून माहिती संकलित करण्यासाठी संरचित प्रश्नावली व मुक्तसंवाद, समूहसंवाद इत्यादी तंत्रांचा अवलंब केला. प्रकल्प प्रभावित कुटुंबाच्या सहभागाचा एक भाग म्हणून केंद्रित समूहचर्चेच्या (एफजीडी) माध्यमातून उपरोल्लेखित घटकांचा समावेश करण्यात आला. प्रस्तुत रस्ता व पूल मौजे कडगांव शिवारातून मार्गिक होवून पुढे राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ ला जोडणारा रस्ता व पूल प्रकल्पाचे काम गेली काही वर्षे आवश्यक आहे. प्रलंबनाची मुख्य कारणे प्रकल्पबाधीत कुटुंबाकडून करावयाचे भूसंपादन आणि संपादित जमिनीचा मोबदला असेच मर्यादित असल्याचे आमच्या लक्षात आले. त्यामुळे प्रस्तुत प्रलंबित रस्ता व पूल बांधकामी आवश्यक जमिनीच्या मोबदल्याची व्यवस्था होण्याच्या दृष्टीने प्रश्नावली तयार करताना प्रश्नांची विचारपूर्वक योजना केली गेली. प्रकल्प गेली काही वर्षे अपेक्षित असल्याने प्रकल्पबाधीत व संभाव्य प्रकल्प लाभधारक अशा दोन्ही समूहांचे आर्थिक व सामाजिक नुकसान झाले आहे. याचे मुख्य कारण प्रस्तुत प्रकल्पाचे संभाव्य लाभ तपासणे असे होते. तसेच डिसेंबर २०१३ च्या अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायद्यान्वये प्रकल्पबाधीतांना त्यांच्या अधिग्रहित जमिनीच्या मोबदल्यात सुयोग्य आर्थिक भरपाई देणेविषयी अभ्यासांती सूचना करणे गरजेचे असल्याने आम्ही प्रस्तुत अभ्यास काटेकोरपणे करण्याचा प्रयत्न केला आहे. संकलित करावयाची प्राथमिक माहिती अचूक, विश्वासार्ह, पृथक्करणक्षम व पर्याप्त असणे अत्यंत आवश्यक होते. तसेच प्राथमिक माहितीद्वारा प्रकल्पबाधीत कुटुंबाचे एकूणच तुलनात्मक कृषी संबंधाचे (Agrarian Relations) आकलन होणेही आवश्यक होते. प्रत्यक्ष क्षेत्र पाहणी करताना असे निदर्शनास आले की, प्रस्तुत प्रकल्पबाधीत कुटुंब दोन भावांचे संयुक्त कुटुंब असून

एक भाऊ नोकरी करत असून दुसरा भाऊ शेतीची जबाबदारी पार पाडत आहे. पर्यायाने सापनि अभ्यासगटाने कुटुंबाचे सर्वेक्षण (Household Survey) करण्याचे निश्चित केले. म्हणजेच सर्वेक्षणादरम्यान प्रस्तुत कुटुंबाबरोबर विस्तृत चर्चा करून करून प्रश्नावलीच्या माध्यमातूनही कुटुंबाचे सर्वेक्षण करण्यात आले. असे करताना आम्हास उपरोल्लेखित प्रकल्पबाधीत कुटुंबातील सर्व व्यक्ती तसेच कुटुंबप्रमुखांस प्रत्यक्ष भेटणे शक्य झाले. अशा प्रकारे प्रकल्पबाधीत कुटुंबाचे सर्वेक्षण पूर्ण होवू शकल्याने आम्ही त्यास जनगणना सर्वेक्षण असे संबोधले आहे. प्रस्तुत प्रकल्पबाधीत कुटुंबाचे सखोल सर्वेक्षण तर झालेच परंतु प्रस्तुत कुटुंबांची सर्व सामाजिक व आर्थिक स्थिती लक्षात आली. अशा प्रकारे प्रकल्पबाधीत कुटुंबाचे प्रस्तुत अभ्यास अहवालाकरीता प्रत्यक्षपणे घरी जावून सर्वेक्षणाचे काम पूर्ण केले आहे. प्रस्तुत सर्वेक्षणातून प्राप्त प्राथमिक माहितीचे पृथक्करण व विश्लेषण करून अहवालात आवश्यक त्या ठिकाणी सविस्तरपणे निष्कर्ष मांडले आहेत. प्राथमिक माहिती संकलन सर्वेक्षणात अधिकाधिक नव्हे तर कुटुंबाच्या सर्वच माहितीचा समावेश करू शकल्याने प्रस्तुत अहवाल सत्यतेच्या महत्तम निकषांवर उतरणारा आहे असा युक्तिवाद सापनि अभ्यासगटामार्फत केला जावू शकतो.

### २.६.३: विशेष समूह चर्चा (Focused Group Discussions):

प्रश्नावलीच्या माध्यमातून संकलित प्राथमिक माहितीव्यतिरिक्त दिनांक १७/१८.१२.२०१८ व १७.०२.२०१९ दरम्यान सापनि अभ्यासगटाने प्रकल्पबाधीत कुटुंब व प्रकल्प लाभधारक गावांची प्रत्यक्ष भेट घेवून प्रकल्पबाधीतांबरोबर विशेष समूह चर्चा (FGDs) घडवून आणल्या. यामुळे प्राथमिक सर्वेक्षणातून प्राप्त माहितीचे अधिक आकलन होण्यास मदत झाली. तसेच प्राथमिक माहिती अधोरेखितही होवू शकली. तसेच सर्वेक्षणप्राप्त प्राथमिक माहितीचे पृथक्करण व विश्लेषण अधिक अचूक पद्धतीने होवू शकले. कारण सर्वेक्षण व चर्चेच्या काळात सापनि अभ्यासगटाने मौजे कडगांव व इतर नऊ गावांच्या (प्रकल्पलाभधारक) भेटी घेवून प्रकल्पाचे लाभ तसेच प्रकल्प अधिग्रहित जमिनींची प्रत्यक्षपणे पाहणी करण्याचे काम पूर्ण केले. कारण डिसेंबर २०१३

च्या ''अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास'' कायद्यान्वये प्रकल्पबाधीतांना त्यांच्या प्रकल्पबाधीत शेतजमिनींच्या मोबदल्यात योग्य त्या प्रमाणात आर्थिक मोबदला मिळणे अत्यावश्यक मानले आहे.









# प्रकरण: ३
# कडगांव रस्ता-पूल प्रकल्प लाभधारक गावांचे पायाभूत सुविधा सर्वेक्षण

**प्रास्ताविक:**

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ ला जोडणारा एकूण ३७ किलोमिटरचा रस्ता भुदरगड तालुक्यातील अनेक गावांचे दळणवळण सुखकर करणारा असेल यात शंका नाही. प्रस्तुत रस्ता एकूण दहा गावांना स्पर्श करून जात असल्यामुळे या गावांचे मानवी व व्यावसायिक दळणवळण वेगवान होवून या भागातील कृषी अर्थव्यवस्थेसमोरील अडचणी दूर होवू शकणार आहेत. तसेच शैक्षणिक व आरोग्याच्या दृष्टीनेही प्रस्तुत रस्ता-पूल प्रकल्प शक्य तितक्या किमान कालावधीत पूर्ण होणे आवश्यक आहे. ज्यामुळे या भागातील ग्रमीण नागरिकांना दळणवळणाच्या सुविधा प्राप्त होवून प्रकल्प विलंबनामुळे प्रकल्प व्ययात होणारी वृद्धी टळू शकेल. प्रस्तुत प्रकल्पाच्या सामाजिक परिणाम निर्धारण अहवालाकरीता अभ्यास करताना आम्ही प्रस्तुत प्रकल्पाची निकड अभ्यासण्याकरीता प्रकल्प मार्गावरील सर्व दहा गावांचे पायाभूत सुविधा सर्वेक्षण पूर्ण केले. याकरीता आम्ही एक प्रश्नावली तयार करून सर्व दहा गावांना प्रत्यक्ष भेटी देवून प्रस्तुत प्रश्नावली प्रत्येक गावचे सरपंच, तलाठी, ग्रामसेवक अथवा उपलब्ध इतर जबाबदार अधिकारी अथवा लोकनियुक्त सदस्यांकडून भरून घेतली आहे.

## ३.१: प्रश्नावलीचे स्वरूप व पायाभूत सुविधा माहिती संकलन:

प्रकल्प लाभधारक सर्व दहा गावांचे पायाभूत सुविधा सर्वेक्षण करताना प्रश्नावलीत आम्ही मूलभूत पायाभूत सुविधा, पिण्याचे पाणी, सिंचन, कृषी विषयक सुविधा, दुग्ध व्यवसाय व पशुपालन, डेअरी, शिक्षण, मानव व जनावरांचे आरोग्य, वित्त व कर्ज आणि नैतिक व सामाजिक आधार अशा सर्व आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक पायाभूत सुविधांचा अंतर्भाव केला. असे सर्वेक्षण करण्याचे कारण म्हणजे अशा सर्व सुविधा ग्रामीण कृषी अर्थव्यवस्था व सामाजिक जीवनमान गतीशील करण्यासाठी या

प्रकारच्या सर्व पायाभूत सुविधांची आवश्यकता असते. या सर्व सुविधा खाजगी कौटुंबिक गुंतवणूकीतून निर्माण होवू शकत नाही. तर याकामी सरकारद्वारा करावयाच्या राजकोषीय तरतूदीतून सार्वजनिक गुंतवणूकीला महत्त्वाची भूमिका पार पाडावी लागते. तसेच अशा पायाभूत सुविधा जर ग्रामीण भागातील नागरिकांना उपलब्ध नसतील तर त्यांना अनेक आर्थिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक व कृषी पणन आणि वित्तीय समस्यांचा सामना करावा लागतो यात शंका नसावी. याचा प्रत्यय महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्याग्रस्त मराठवाडा व विदर्भात प्रकर्षाने येतो. अनेकदा आत्महत्येकरीता विष प्राशन केलेल्या व्यक्तीस खाजगी दवाखाना अथवा सार्वजनिक आरोग्य केंद्र गावात अथवा नजिकच्या गावात उपलब्ध नसल्यामुळे कुटुंबातील व्यक्तींच्या विष प्राशन केल्याचे लक्षात येवूनही आत्महत्या प्रवृत्त सदस्याचे प्राण वाचविता येत नाहीत. तसेच दवाखान्याच्या गावापर्यंत पोहोचण्यासाठी जर चांगला रस्ता नसेल तर वेळेचा अपव्यय होवून अशा व्यक्तीचा प्राण वाचविणे अशक्य बनते. गावातील मुलामुलींच्या शिक्षणासाठी रस्त्यासारख्या पायाभूत सुविधांची व दळणवळणाची आत्यंतिक आवश्यकता असते. कृषी क्षेत्रासाठी तर आदाने व उत्पादन बाजारपेठेपर्यंत पोहोचविण्याचे कामी दळणवळण सुविधांत रस्त्यांची भूमिका अनन्यसाधारण महत्त्वाची मानली जाते. अनेकदा कृषी उत्पादन वेळेवर बाजारपेठेत न पोहोचल्यामुळे त्यांचे नुकसान होते. विशेषत: नाशवंत कृषी मालाच्या बाबतीत तर हे नुकसान अधिक असते. इत्यादी सर्व घटकांचा विचार करून आम्ही राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ ला जोडणाऱ्या ३७ किलोमिटरच्या प्रस्तुत रस्त्याच्या टप्प्यातील सर्व दहा गावांचे पायाभूत सुविधा सर्वेक्षण पूर्ण केले. या सर्वेक्षणात ममदापूर, तवेले, वेंगरूळ, तककरवाडी, मेघोली, सोनुर्ली, शेकोली, परखेडे, गडदवाडी व न्हाव्याची वाडी इत्यादी गावांचा समावेश आहे. निम्नऊर्धृत तक्त्यात उपरोल्लेखित गावांच्या पायाभूत सुविधांविषयीचे अवलोकन होवू शकते.

**तक्ता ३.१: प्रकल्पलाभधारक गावांच्या पायाभूत सुविधा:**

| अ. क्र. | मूलभूत सुविधा प्रकार | अ. क्र. | सुविधेचा तपशील | प्रमाण (टक्केवारी) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | होय | नाही | एकूण |
| १ | मूलभूत पायाभूत सुविधा | १ | पक्का रस्ता | 55.60 | 44.44 | 100.00 |
| | | २ | कच्चा रस्ता | 77.80 | 22.20 | 100.00 |
| | | ३ | बस स्थानक | 11.10 | 88.90 | 100.00 |
| | | ४ | रेल्वे स्थानक | 00.00 | 100.00 | 100.00 |
| | | ५ | विद्युत उपकेंद्र | 11.10 | 88.90 | 100.00 |
| | | ६ | दूरध्वनी कार्यालय | 00.00 | 100.00 | 100.00 |
| | | ७ | पोस्ट ऑफीस | 22.20 | 77.80 | 100.00 |
| | | ८ | पोलीस स्टेशन | 00.00 | 100.00 | 100.00 |
| | | ९ | स्थानिक बाजार | 11.10 | 88.90 | 100.00 |
| २ | पिण्याचे पाणी | १० | पाईपलाईन | 100.00 | 00.00 | 100.00 |
| | | ११ | नळपाणी | 22.20 | 77.80 | 100.00 |
| | | १२ | खुली विहीर | 11.10 | 88.90 | 100.00 |
| | | १३ | कूपनलिका | 00.00 | 100.00 | 100.00 |
| ३ | सिंचन | १४ | पाझर तलाव | 11.10 | 88.90 | 100.00 |
| | | १५ | नाला बंडींग | 00.00 | 100.00 | 100.00 |
| | | १६ | कोल्हापूर बंधारा | 00.00 | 100.00 | 100.00 |
| | | १७ | सिंचन बंधारा | 00.00 | 100.00 | 100.00 |
| | | १८ | पाटपाणी | 00.00 | 100.00 | 100.00 |
| | | १९ | सहकारी पाईपलाईन | 88.90 | 11.10 | 100.00 |
| ४ | कृषी पाठिंबा | २० | कृषी सेवा केंद्र | 22.20 | 77.80 | 100.00 |
| | | २१ | कृषी उत्पन्न बाजार समिती | 11.10 | 88.90 | 100.00 |
| ५ | दुग्ध व्यवसाय | २२ | सहकारी दूध डेअरी | 100.00 | 00.00 | 100.00 |
| | | २३ | खाजगी दूध डेअरी | 00.00 | 100.00 | 100.00 |
| ६ | शिक्षण | २४ | प्राथमिक शाळा | 88.90 | 11.10 | 100.00 |
| | | २५ | माध्यमिक शाळा | 44.40 | 11.10 | 100.00 |
| | | २६ | कनिष्ठ महाविद्यालय | 00.00 | 100.00 | 100.00 |
| | | २७ | वरिष्ठ महाविद्यालय | 11.10 | 88.90 | 100.00 |
| | | २८ | औद्योगिक प्रशिक्षण केंद्र | 00.00 | 100.00 | 100.00 |
| | | २९ | अभियांत्रिकी पदविका महाविद्यालय | 00.00 | 100.00 | 100.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ३० | अभियांत्रिकी पदवी महाविद्यालय | 00.00 | 100.00 | 100.00 |
| ७ | मानवी व पशु आरोग्य | ३१ | खाजगी दवाखाना | 33.30 | 67.70 | 100.00 |
| | | ३२ | खाजगी डॉक्टर | 66.70 | 33.30 | 100.00 |
| | | ३३ | ग्रामीण आरोग्य केंद्र | 22.20 | 77.80 | 100.00 |
| | | ३४ | सरकारी दवाखाना | 00.00 | 100.00 | 100.00 |
| | | ३५ | जनावरांचा दवाखाना | 00.00 | 100.00 | 100.00 |
| ८ | वित्त व कर्ज विषयक | ३६ | प्राथमिक कृषी पतसंस्था | 66.70 | 33.30 | 100.00 |
| | | ३७ | सहकारी पतसंस्था | 11.10 | 88.90 | 100.00 |
| | | ३८ | सहकारी बँक | 11.10 | 88.90 | 100.00 |
| | | ३९ | विमा कार्यालय | 00.00 | 100.00 | 100.00 |
| | | ४० | राष्ट्रीयकृत बँक शाखा | 00.00 | 100.00 | 100.00 |
| ९ | नैतिक व सामाजिक पाठिंबा | ४१ | युवा मंडळ | 100.00 | 00.00 | 100.00 |
| | | ४२ | शेतकरी मंडळ | 66.70 | 33.30 | 100.00 |
| | | ४३ | स्वयं सहाय्यता बचत गट | 00.00 | 100.00 | 100.00 |
| | | ४४ | स्वयंसेवी संस्था | 44.40 | 55.50 | 100.00 |

***संदर्भ:*** *प्रकल्प लाभधारक गावांचे क्षेत्र सर्वेक्षण.*

उपरोल्लेखित तक्त्यात आम्ही नऊ मूलभूत पायाभूत सुविधांतर्गत एकूण ४४ उपसुविधांचे विवेचन दिलेले आहे. अभ्यासाच्या दृष्टीने आम्ही या सर्व उपसुविधा संबंधित गावात उपलब्ध आहेत अथवा नाहीत याचे प्रमाण टक्केवारीने दर्शविले आहे. त्यामुळे जर गावात अशा सुविधा उपलब्ध नसतील तर अशा गावातील शेतकरी, विद्यार्थी, नोकरदार, आरोग्य समस्याधारक, दूध उत्पादक अथवा इतर नागरिकांना संबंधित पायाभूत सुविधा जसे की; शिक्षण, आरोग्य, बाजारपेठ इत्यादीपर्यंत पोहोचण्याचे कामी प्रस्तावित रस्त्यामुळे वेगवान होवू शकणार आहे. अर्थात या सर्व गावांमधून जाणारा रस्ता जरी सध्या उपलब्ध असला तरी त्याचा आवश्यकतेनुरूप विस्तार व विकास आणि वर्षभर दळणवळण निर्भरता प्रामुख्याने मौजे कडगांव येथे प्रस्तावित पूलाचे बांधकाम व त्याकामी करावयाच्या भूसंपादनावर अवलंबून आहे. मूलभूत सुविधांचा विचार केला तर पक्का रस्ता या सर्व गावांपैकी ४४.४० टक्के गावांना उपलब्ध नाही तर बस थांबा (८८.९० टक्के), रेल्वे स्टेशन (१०० टक्के), वीज उपकेंद्र (८८.९० टक्के), दूरध्वनी

(१०० टक्के), पोस्ट ऑफीस (७७.८० टक्के), पोलीस स्टेशान (१०० टक्के) आणि स्थानिक बाजारपेठ (८८.९० टक्के) इत्यादी सुविधा या गावांना उपलब्ध नाहीत. त्यामुळे या सर्व आवश्यक सुविधा प्राप्त करण्याकामी या गावातील नागरिकांना जेथे या सुविधा उपलब्ध असतील अशा दुसऱ्या गावी जाणे आवश्यक असते. आणि जर रस्ताच नसेल किंवा पावसाळ्याच्या दिवसात अधिक पर्जन्यमान असलेल्या या प्रदेशात प्रस्तावित पूल उपलब्ध नसेल तर या सर्व ग्रामीण लोकांचे जीवनमान उपरोल्लेखित सुविधांअभावी कष्टप्रद होत असणार यात शंका नाही.

ग्रामीण भागात शैक्षणिक सुविधा शक्यतो प्राथमिक अथवा माध्यमिक पातळीपर्यंतच उपलब्ध असतात. त्यामुळे नंतरच्या शिक्षणासाठी गावातील मुलामुलींना इतर ठिकाणी जाणे आवश्यक असल्याने दळणवळणाच्या सुविधा व पक्के रस्ते गावांशी जोडलेले असावेत. प्रस्तावित रस्ता-पूल पूकल्पाच्या बहुतांशी लाभधारक गावात माध्यमिक शाळा (५५.६० टक्के), कनिष्ठ महाविद्यालय (१०० टक्के), वरिष्ठ महाविद्यालय (८८.९० टक्के), औद्योगिक प्रशिक्षण संस्था (१०० टक्के), अभियांत्रिकी पदविका महाविद्यालय (१०० टक्के), अभियांत्रिकी पदवी महाविद्यालय (१०० टक्के) इत्यादींच्या सुविधा उपलब्ध नाहीत. या सर्व प्रकारच्या शिक्षणासाठी या सर्व प्रकल्प लाभधारक गावांना इतर ठिकाणी जावे लागते व त्याकामी वर्षातील सर्व काळात वाहतूक, दळणवळण व रस्त्याच्या सुविधा उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे. म्हणून प्रस्तुत रस्ता-पूल प्रलंबन सत्वर मार्गी लागणे आवश्यक आहे. आरोग्य सुविधांच्या बाबतीतही या सर्व गावांची स्थिती शैक्षणिक सुविधांप्रमाणेच आहे. या सर्व गावांच्या खाजगी व सार्वजनिक आरोग्य सुविधांचा विचार केला तर; खाजगी दवाखाना (६६.७० टक्के), खाजगी डॉक्टर (३३.३१ टक्के), ग्रामीण आरोग्य केंद्र (७७.३१ टक्के) तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचीही सुविधा नाही. त्यामुळे या शेतकऱ्यांना आपला शेतमाल विक्रीस नेण्यासाठी वाहतूक व दळणवळणाच्या अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे. हा सर्व परिसर अधिक पर्जन्यमानाचा असल्यामुळे पावसाळ्याच्या दिवसात आरोग्य, बाजारपेठ,

शिक्षण, बँक व्यवहार, कृषी आदान खरेदी व उत्पादन विक्री इत्यादीकरीता वर्षभर सुरू राहू शकेल अशा दळणवळणाच्या सुविधा उपलब्ध असणे आवश्यक आहे. वित्त व कर्ज विषयक सुविधांची निकड ग्रामीण शेतकरीवर्गास सातत्याने भासते. या दृष्टीकोनातून विचार केला तर यापैकी अनेक सुविधा या प्रस्तावित गावांना स्थानिक पातळीवर उपलब्ध नसल्यामुळे त्या सर्व सुविधा दळणवळण निर्भर आहेत. उदाहरणार्थ प्राथमिक कृषी सहकारी सोसायटी (३३.३० टक्के), सहकारी पतसंस्था (८८.९० टक्के), सहकारी बँक (८८.९० टक्के), विमा कार्यालय/शाखा (१०० टक्के), राष्ट्रीयकृत/व्यापारी बँक शाखा (१०० टक्के) इत्यादींच्या सुविधा या गावांत कंसात दर्शविलेल्या प्रमाणात उपलब्ध नाहीत. त्यामुळे जर अशा गावांचा संपर्क इतर सुधारित गावांशी आला तर त्यामुळे तेथील नागरिक व विद्यार्थ्यांना एक प्रकारे सामाजिक व नैतिक पाठिंबा मिळू शकतो. त्यामुळेही या सर्व गावांकरीता प्रस्तावित रस्ता-पूल प्रकल्प अत्यंत आवश्यक आहे.

एकंदरीत काय तर ग्रामीण व कृषी विकासप्रक्रियेत रस्ते व दळणवळणाच्या सुविधा अत्यंत महत्त्वाची भूमिका पार पाडतात. या सर्व गावांच्या पिक पद्धतीत ऊस पिकाचे अधिक प्राबल्य आहे. परंतु ऊसाची वाहतूक आजरा सहकारी साखर कारखान्यापर्यंत करण्याकरीता मौजे कडगांव येथील कोल्हापूर बंधाऱ्यावरूनच केली जाते व ते अत्यंत धोकादायक आहे. आजरा शहराच्या पश्चिमेस आजरा सहकारी साखर कारखाना वीस किलोमिटर अंतरावर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ नजिक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची प्रस्तुत समस्याही या पूलाच्या बांधकामामुळे सुटणार आहे. उपरोक्त सर्व बाबींचा परामर्श घेता असेच अनुमान निघते की प्रस्तावित रस्ता व पूल प्रकल्प शक्य तितक्या लवकर मार्गी लागणे आवश्यक आहे. तसेच या प्रकल्पामुळे एकच कुटुंब प्रकल्पबाधीत होत असल्यामुळे प्रस्तुत प्रकल्पाचा सामाजिक लाभ प्रकल्पाच्या सामाजिक व्ययापेक्षा निश्चितच अधिक आहे. परंतु प्रकरण चार मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रस्तुत प्रकल्पाच्या प्रकल्पबाधीत कुटुंबाच्या सामाजिक व आर्थिक पार्श्वभूमीचा व्यवस्थितपणे विचार करून संबंधित कुटुंबास बाधीत जमिनीचा योग्य मोबदला दिला तर प्रकल्प विस्थापनाची पातळी

किमान राहून सामाजिक व्यय व कल्याण समतोलाचे तत्वही अधोरेखित होईल. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम खात्याने उपलब्ध असलेली मौजे कडगांव येथील जागा प्रकल्प संपादित जमिनीच्या बदल्यात प्रकल्पबाधीतास देवू करण्यात कोणतीच अडचण नसावी.

# प्रकरण: ४
# कडगांव रस्ता-पूल बांधकाम प्रकल्पबाधीत कुटुंबावरील सामाजिक व आर्थिक परिणामाचे अवलोकन

**प्रस्ताविक:**

कोल्हापूर जिल्हा भुदरगड तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ हा रस्ता ममदापूर, तवले, वेंगरूळ, तळकरवाडी, मेघोली, सोनुर्ली, शेळोली, पडखंबे, गडदूवाडी व न्हाव्याची वाडी इत्यादी गावांना वाहतुकीसाठी उपलब्ध करून देणेकरीता एकूण ३७ किलोमिटर एवढा जोडरस्ता विकसित करणे आवश्यक आहे. याकामी कडगांव शिवारात २.६९ कोटी रूपये खचचा एक मोठा पूल बांधणे आवश्यक असून खर्चाचा प्रस्तुत पुलाकरीता जमीन संपादनाची आवश्यकता असल्याने प्रस्तुत रस्त्याचे मुख्यत्वे पूलाचे काम सध्या स्थगित अवस्थेत असल्याने प्रस्तुत पूलबांधणी कामी प्रकल्पबाधीत क्षेत्राचा सामाजिक परिणाम अभ्यास अहवाल तयार करण्याचे काम आम्ही शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभागामार्फत पूर्ण केले आहे. प्रस्तुत प्रकल्पाकरीता मौजे कडगांव येथील आत्मारात दत्तात्रय देसाई यांच्या मालकीच्या जमिनीची आवश्यकता असल्याने त्याविषयीच्या विस्तृत विवेचनाचा समावेश या प्रकरणात आहे. प्रस्तुत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ ला जोडण्याकामी मौजे कडगांव येथील मोठ्या पूलाची आवश्यकता असल्याने पूलाचे बांधकाम मार्गी लागल्यास उपरोल्लेखित सर्व गावांना राष्ट्रीय महामार्गाची सुविधा दळणवळणकरीता उपलब्ध होवून त्यांचे घरगुती व व्यावसायिक दळणवळण सुखकर व वेगवान होवू शकेल याची नोंद घेणे आवश्यक आहे. विशेष म्हणजे प्रस्तुत रस्त्याकरीता खूप मोठया प्रमाणात जमीन हस्तांतरणाची आवश्यकता नसल्यामुळे याकामी जर सार्वजनिक बांधकाम खात्याने सकारात्मक भूमिका घेवून मौजे कडगांवच्या पूल बांधणीकरीता आवश्यक असलेल्या अल्पश: जमिनीचा प्रकल्पबाधीतास योग्य तो मोबदला आर्थिक रक्कम अथवा जमिनीच्या बदल्यात जमीन असा दिला तर प्रस्तुत जमीन संपादन विनाविलंब होवून कामाचा वेग वाढून सत्वर पूर्णत्वास जाणे शक्य होईल. वास्तविक पाहता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ ला जोडणारा उपरोल्लेखित गावातून हा रस्ता जात असला तरी त्यावरील

जड वाहनांची वाहतूक मौजे कडगांवच्या नदीवर पूर्वी बांधलेल्या कोल्हापूर बंधाऱ्यावरून होत असल्याने अशा जड वाहतूकीस केव्हांही धोका संभवतो. महत्त्वाचे असे की या सर्व परिसरातील आजरा सहकारी साखर कारखान्याची बहुतांश ऊस वाहतूक या रस्त्यावरून होत असल्याने त्याकरीताही प्रस्तुत कोल्हापूर बंधाऱ्याचा वापर होत असल्याचे आमच्या क्षेत्र पाहणीत दिसून आले.

### ४.१: जमीन संपादनाची पूर्वपिठिका:

उपरोल्लेख केल्याप्रमाणे प्रस्तुत राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ ला जोडून भुदरगड तालुक्यातील उपरोल्लेखित अनेक गावांची व्यावसायिक व कौटुंबिक दळणवळणाची सुविधा सुकर करणाऱ्या एकूण ३७ किलोमिटर रस्त्याची विकास निर्भरता मौजे कडगांव येथील कोल्हापूर बंधाऱ्यास पर्यायी पूलाच्या बांधकामावर अवलंबून आहे. विशेष म्हणजे प्रस्तुत पूलाच्या बांधकामाकरीता महाराष्ट्र जमीन महसूल अभिलेख फेरवाटप क्रमांक १५२, दिनांक २०/०२/२०१८ अन्वये कोल्हापूर बंधारा पर्यायी पूल बांधकामाकरीता मौजे कडगांव येथील शेतकरी श्री. आत्माराम दत्तात्रय देसाई या एकाच शेतकऱ्याची साधारणपणे ०२ आर नदी/पाईपलाईन बागायत क्षेत्र जमीन संपादन करणे आवश्यक आहे. प्रस्तुत जमीन उपरोल्लेखित कागदोपत्री जिरायत असल्याचे जरी नमूद असले तरी प्रत्यक्ष स्थळभेटीचे वेळी आमच्या अभ्यासगटाच्या असे निदर्शनास आले आहे की, मौजे कडगांव नदीपात्रात या शेतकऱ्याने दहा अश्वशक्तीचा वीजपंप बसविला असून त्या आधारे साधारणपणे २५०० फूट इतकी पाईपलाईन टाकून प्रस्तुत शेतजमिन बागायती केलेली आहे. सध्या या शेतजमिनीवर ऊसाच्या पिकाची लागवड केलेली असल्याचे आमच्या निदर्शनास आले. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम अथवा जिल्हा जमीन अधिग्रहण व पुनर्वसन प्रशासनाने सदर जमिनीची गणना जिरायत जमीन अशी न करता अधिग्रहण मोबदला ठरविताना बागायत जमीन असाच करणे आवश्यक आहे. तसेच दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे प्रस्तुत जमिनीचे एकूण क्षेत्रफळ ९५ आर २.३७ एकर इतके असून प्रस्तावित रस्ता-पूलाचे बांधकाम संबंधित जमिनीचे विभाजन करून तुकड्यात रूपांतर करत असल्याने पर्यायाने अधिग्रहणामुळे या जमिनीचे दोन भिन्न व अत्यंत लहान तुकड्यात रूपांतर होणार आहे. त्यामुळे जमिनीचा जो भाग अधिग्रहित होणार आहे तो भाग राष्ट्रीय महामार्गास

जोडणाऱ्या रस्त्याच्या कामी येत असल्यामुळे त्याचे बाजारमूल्य परिसरातील बिगर शेतजमिनीइतकेच गृहित धरणे आवश्यक आहे. परंतु तसा उल्लेख फेरफार क्रमांक २५२ दिनांक २०/०२/२०१८ मध्ये दिसून येत नाही. अर्थात अशा प्रकारचा रस्ता जेव्हा परिसरातून जातो तेव्हा जमिनीचे मूल्य अनेकपटींनी वधारते कारण अशा प्रकल्पालगत साधन मूल्य भांडवलीकरणाची (तरश्रींश उरळींरश्रळूरींळेप) प्रक्रिया कार्यान्वित होत असते.

## ४.२: प्रकल्पबाधीत कुटुंबाची सामाजिक आर्थिक पार्श्वभूमी:

प्रस्तुत सामाजिक परिणाम मूल्यांकन अहवाल अभ्यासाच्या विविध टप्प्यांपैकी क्षेत्रभेट, विशेष गटचर्चा, प्रकल्प लाभधारकांशी संवाद, प्रकल्पबाधीतांशी संवाद तसेच प्रकल्पासंबंधित महसूल व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधण्याचे काम अभ्यासगटाने प्रकल्प अभ्यासाच्या सुरूवातीच्या टप्प्यावर पूर्ण केले आहे. या व्यतिरिक्त प्रस्तुत रस्ता - पूल की ज्यामुळे एकूण ३७ किलोमिटरच्या रस्त्याची वाहतूक राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ ला संलग्न होवून एकूणच दळणवळण किफायतशीर तसेच वेगवान होणे शक्य होणार आहे अशा सर्व गावांचे पायाभूत सुविधा सर्वेक्षण पूर्ण केले आहे. प्रस्तुत अहवालाचे प्रकरण तीन या पायाभूत सुविधा सर्वेक्षणावर बेतले आहे. प्रस्तुत सर्वेक्षण कामी आम्ही एक विस्तृत प्रश्नावली तयार करून प्रत्यक्ष गावांना भेटी देवून सरपंच, ग्रामसेवक, कामगार, तलाठी अथवा गावातील इतर जबाबदार व लोकनियुक्त व्यक्तींकडून संबंधित प्रश्नावलीच्या माध्यमातून सर्व लाभधारक गावांचे पायाभूत सर्वेक्षण पूर्ण करून घेतले. या व्यतिरिक्त प्रस्तुत रस्ता-पूल प्रकल्पबाधीत एकमेव शेतकरी कुटुंबाकरीता २८ पानांची एक विस्तृत प्रश्नावली तयार करून दिनांक १७/०२/२०१९ रोजी प्रकल्पबाधीत शेतकरी श्री. आत्मारात दत्तात्रय देसाई यांच्याशी विस्तृतपणे चर्चा करत प्रश्नावली भरून घेतली. संबंधित प्रश्नावलीच्या माध्यमातून या प्रकल्पबाधीत कुटुंबाविषयी आम्हास खालीलप्रमाणे विवेचन प्राप्त झाले.

प्रकल्पबाधीत कुटुंब दोन भावांचे अनुक्रमे आत्माराव व विठ्ठल दत्तात्रय देसाई संयुक्त कुटुंब असून दोघाही भावांना प्रत्येकी दोन मुली व एक मुलगा व एक मुलगी अशी सध्या शिक्षण घेणारी अपत्ये असून

दोघांच्याही पत्नी घरकाम करत त्यांच्या शेती व्यवसायास हातभार लावतात. प्रस्तुत दोन भावांची वयोवृद्ध आई वय वर्षे ७२ असून वडील हयात नाहीत. कुटुंबप्रमुख श्री. आत्माराम दत्तात्रय देसाई हे माध्यमिक शिक्षक आहेत.

### ४.३: प्रकल्पबाधीत कुटुंबाचे धारणक्षेत्र विषयक:

प्रस्तुत प्रकल्पबाधीत कुटुंबाकडे प्रकल्पबाधीत क्षेत्र ठिकाणच्या ९५ आर नदी बागायत जमिनीव्यतिरिक्त उपरोल्लेखित दोन भावांचे नावे पावसावर अवलंबून पिक योग्य एकूण ०३ एकर जमीन आहे. प्रस्तुत जमिनीत वर्षाकाठी भात, नागली, नाचणी, भुईमूग इत्यादी प्रकारची खरीपातील पर्जन्याधारित पिके घेवून कुटुंबाचा उदरनिर्वाह चालतो. तसेच शेती उत्पन्नाव्यतिरिक्त दोन म्हशी असून आलटून पालटून सतत एक म्हैस दुभती असल्याने रोजचे साधारणपणे दोन लिटर दूध अंदाजे ३६/३७/३८ रूपये प्रती लिटर प्रमाणे विकून कुटुंबाच्या उत्पन्नात भर पडताना दिसून येते.

### ४.४: कुटुंबाची आर्थिक व सामाजिक परिस्थिती:

प्रकल्पबाधीत कुटुंबाचे मौजे कडगांव येथे एकूण पाच खोल्यांचे कौलारू छपराचे वीट बांधकाम असलेले घर असून घरात आवश्यक त्या इतर सुविधा उपलब्ध आहेत. तसेच एखाद्या सामान्य कुटुंबाच्या घरात असतील अशा टिकाऊ उपभोग्य साहित्याची उपलब्धता असल्याचे आम्हास प्रत्यक्ष क्षेत्रभेटीवेळी निदर्शनास आले. दळणवळण साधने म्हणून कुटंबात एक मोटारसायकल व एक मारूती वाहन आहे. याचे कारण प्रस्तुत कुटुंबाचे शेती उत्पन्न नव्हे तर कुटुंबप्रमुख मौजे कडगांव येथील माध्यमिक शाळेत शिक्षकाची नोकरी करत असल्याने शक्य झाले असावे. प्रकल्पबाधीत कुटुंब संयुक्त कुटुंब असले तरी दोन्ही भावांचे नावे वेगवेगळी अशी दोन रेशनकार्डस असून त्यापैकी एक रेशनकार्ड पांढरे तर शेती करत असलेल्या भावाचे नावे रेशनकार्ड केशरी रंगाचे आहे. ज्यामुळे कुटुंबाला स्वस्त धान्य दुकानातून मिळणारे काही फायदे प्राप्त होवू शकतात.

### ४.५: धारणक्षेत्र, उत्पादकता व परिसरातील शेतजमिनीच्या बाजारभावाचे विवेचन:

उपरोल्लेख केल्याप्रमाणे प्रकल्पबाधीत ठिकाणच्या गट क्रमांक २५२/अ व ब एकूण ९५ आर (२.३७ एकर) जमिनीव्यतिरिक्त प्रस्तुत कुटुंबाकडे एक हंगामी दोन्ही भावांच्या नावे मिळून अशी एकूण तीन एकर जिरायत जमीन आहे. प्रस्तुत जमिनीत मिळणारी पिकवार प्रती एकर एकण उत्पादकता भात - ३०, नाचणी - १२ तर भुईमूग - ०८ क्विंटल याप्रमाणे आहे. प्रकल्पबाधीत ठिकाणची जमीन नदीकाठची असल्यामुळे व नदीवर दहा अश्वशक्तीचा वीजपंप आणि २५०० फूटांची पाईपलाईन करून बागायती केल्यामुळे ऊसाचे पिक घेणे शक्य झाले आहे. या जमिनीतून ऊसाची ६० मेट्रिक टन एवढी एकरी उत्पादकता मिळत असल्याने वर्षाकाठी साधारणपणे एकूण १४२.५ (१४० ते १५०) मेट्रिक टन एवढे उत्पादन मिळते.

प्रकल्पबाधीत परिसरातील शेतजमिनींच्या बाजार किंमतीविषयीचे विवेचन अचंबित करणारे आहे. मूळातच भारत कृषीप्रधान देश असला आणि देशातील अधिकतम जनतेचे मिळकतीचे प्रमुख साधन शेतजमिन असली तरी या मालमत्तेची बाजारपेठ अद्यापही अविकसितच असल्याचेच दिसून येते. पर्यायाने इतर संपत्ती साधने अथवा उत्पादितांच्या बाजार किंमतीप्रमाणे अनियंत्रित मागणी-पुरवठा शक्तींद्वारा शेतजमिनीची किंमत देशात कोठेही निश्चित होत नाही. असे त्रिकालाबाधीत सत्य मान्य करावे लागते. एकतर जमीन हा शेतकऱ्यांसाठी फक्त एक आर्थिक घटक नसून त्याच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनमानाचे ते एक साधन आहे. त्यामुळे जमिनीची खरेदी-विक्री किंमत निश्चित होताना फक्त जमिनीचा पुरवठा, मागणी, प्रतवारी, पाणीपुरवठा इत्यादी सुविधाच फक्त प्रभाव पाडत नाहीत तर इतर अनेक सांस्कृतिक व ऐतिहासिक पार्श्वभूमी निश्चित करणारे घटकही महत्त्वाचे असतात. दुर्देवाने स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात कृषी व्यतिरिक्त रोजगाराची साधने निर्माण होवू न शकल्यामुळे जमिनीवरील ताण वाढून धारणक्षेत्राचे विभाजन व तुकडीकरण होत जावून संपूर्ण देशपातळीवर धारणक्षेत्राचे आकारमान अकिफायतशीर होण्यात त्याचे रूपांतर झाले. कोल्हापूर जिल्ह्याचा परिसर कोकणाशी प्रत्यक्षपणे जोडलेला असल्यामुळे प्रकल्प परिसराचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान साधारणपणे १३०० मिमि आहे. अशा प्रकारच्या शाश्वत पर्जन्यमानाच्या परिसरात परंपरागत जमिनीवरील हक्क सोडण्यास शक्यतो कोणी तयार होत नाही. त्यामुळे या परिसरात धारणक्षेत्राचे विभाजन व तुकडीकरणाचे

प्रमाण अधिक असून आकारमानही किमान व अकिफायतशीर पातळीवर असल्याचे निदर्शनास येते. शेती हा एकमेव व्यवसाय उपलब्ध असल्याने व उत्तम पर्जन्यमान्य असलेल्या अशा परिसरात लहान धरणक्षेत्रावरही कुटुंबाची उपजिविका शक्य असल्यामुळे या परिसरात जमीन खरेदी-विक्रीचे प्रमाणच मुळात अत्यल्प आहे. त्यामुळे विक्रीयोग्य जमिनीचा पुरवठाच नसल्यामुळे जमिनीच्या किंमती अधिक असल्याचेच दिसून येते. एकतर धारणक्षेत्र लहान व खरेदी-विक्रीयोग्य जमिनीचा अत्यल्प पुरवठा या दोन कारणांमुळे या परिसरात जमिनीच्या किंमती प्रती एकर रूपये ४० लक्ष पेक्षाही अधिक असल्याचे क्षेत्रपाहणीच्यावेळी अनेक ग्रामस्थांनी नमूद केले. पर्यायाने रस्ता संलग्न जमिनीच्या किंमती निश्चितच यापेक्षा जास्त आहेत. याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. या परिसरातील शेतजमिनीच्या किंमती प्रती गुंठा किमान एक लक्ष तर रस्त्यालगतच्या जमिनीच्या किंमती प्रती गुंठा किमान पाच लक्ष आहेत असे अनेक ग्रामस्थांनी गटचर्चेच्यावेळी नमूद केले.

### ४.६: प्रकल्पबाधीत कुटुंबाची वित्तीय/कर्जविषयक स्थिती:

भारतात बिगर कर्जधारक शेतकरी कुटुंब सापडणे जवळजवळ अशक्य आहे. तसेच कृषी कर्ज थकबाकीदार कुटुंबाचे प्रमाणही पन्नास (५२.५०) टक्क्यांपेक्षाही जासत तर प्रती कृषी कुटुंब कर्ज थकबाकीची राष्ट्रीय सरासरी १,०४,६०२ रूपये असल्याचे दिसून येते (NABARD, 2018)[२०]. याचे कारण धारणक्षेत्राचे आकारमान व इतर अनेक कारणांमुळे शेतकऱ्यांना कर्जे घ्यावी लागतात. प्रसंगी अनुत्पादक कार्यासाठीही शेतकऱ्यांना उपभोग्य कर्जाची आवश्यकता भासते. अशी कर्जे बिगर संस्थात्मक मार्गांनी अधिक व्याजदराने घेणे भाग पडते. प्रस्तुत प्रकल्पबाधीत कुटुंबाचे एकूण पिककर्ज चार लक्ष रूपयांचे असून बँक ऑफ महाराष्ट्रद्वारा हे कर्ज घेतलेले आहे. प्रस्तुत कर्ज प्रतिवर्षी जुने-नवे करणे बंधनकारक असते. अर्थात असे करणे शक्य झाले नाही तर शेतकऱ्याला कर्जव्याज सवलतीचा लाभ

[20] *NABARD (2018), All India Rural Financial Inclusion Survey, National Bank for Agricultural and Rural Development, Mumbai*

मिळत नाही. प्रस्तुत कुटुंबाच्या वित्तीय व कर्जविषयक स्थितीचा लेखाजोखा घेता असेच दिसून येते की प्रकल्पबाधीत कुटुंबाची आर्थिक परिस्थिती इतर सामान्य ग्रामीण कुटुंबाप्रमाणेच आहे.

### ४.७: प्रकल्पबाधीत कुटुंबाची भूमी अधिग्रहण पार्श्वभूमी:

प्रस्तावित रस्ता-पूलबांधणी प्रकल्पाचे काम प्रकल्पबाधीत कुटुंबाच्या गट क्रमांक २५२ अ मधील ९५.०० आर क्षेत्रापैकी १३.०० आर भूखंडाच्या मधोमध होणार असून या भूखंडाचे पूलबांधणीमुळे पुलाखाली जाणाऱ्या अंदाजे ०२.०० आर क्षेत्राव्यतिरिक्त दोन भिन्न तुकड्यांत रूपांतर होणार आहे. पर्यायाने सार्वजनिक बांधकाम खात्याच्या आवश्यकतेनुसार जरी फक्त ०२.०० आर एवढेच क्षेत्र तांत्रिकदृष्ट्या बाधीत अथवा अधिग्रहित होणार असले तरीही या छोट्याशा जमीन तुकड्याचे पूल बांधकामामुळे पूल संलग्न दोन्ही बाजूस पोटखराबा निर्माण होणार असल्यामुळे प्रकल्पबाधीत कुटुंबाचे वास्तव नुकसान तांत्रिक अधिग्रहित जमीन आकारमानापेक्षा अधिक प्रमाणात होणार आहे. तसेच उर्वरित जमिनीचा लहान तुकडा कृषी लागवडीकरीता अकिफायतशीर होणार असल्यामुळे भविष्यातील कृषी लागवडीची गैरसोय प्रकल्पबाधीत कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या नुकसानकारकच ठरणार आहे. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या ०२.०० आर अधिग्रहणाचा युक्तिवाद प्रकल्पबाधीत कुटुंबाला मात्र अधिक नुकसानकारक असणार यात शंका नाही.

प्रस्तुत कुटुंबाच्या जमीन अधिग्रहण विषयक दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या कुटुंबाची प्रस्तुत गट क्रमांकान्वये २५२/अ व ब यापूर्वी अनुक्रमे कोल्हापूर बंधारा व स्मशान दहनभूमीकरीताही जमीन अधिग्रहण झालेले आहे. त्यामुळे प्रस्तुत रस्ता-पूल प्रकल्पाकरीता या कुटुंबाच्या २५२ अ याच गट क्रमांकावरील जमिनीचे अनुक्रमे तिसरे अधिग्रहण असणार आहे असे नमूद करणे अत्यावश्यक आहे.

### ४.८: अधिग्रहणाविषयी प्रकल्पबाधीत कुटुंबाची अनभिज्ञता:

२०१३ च्या सुधारित भूमी अधिग्रहण, पुनर्वसन व पुनर्निवास कायद्यान्वये प्रकल्पबाधीत संसाधनांचे अधिग्रहण मूल्य व प्रकल्पबाधीत कुटुंबाच्या पुनर्वसन विषयक अनेक तरतूदी व कोटेकोर नियमावली उपलब्ध आहे. तत्पूर्वीच्या म्हणजे १८९४ च्या भूमी अधिग्रहण कायद्यान्वये प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांप्रती

सरकारचे अथवा प्रकल्प विभागाचे फारसे उत्तरदायित्व अस्तित्वात नव्हते. असे असले तरीही प्रस्तुत रस्ता-पूल बांधणी प्रकल्पात प्रकल्पबाधीत कुटुंबाची एकूण किती जमीन बाधीत होणार अथवा त्याकरीता संबंधित कुटुंबास कशा दराने व एकूण किती मोबदला मिळणार याविषयी जिल्हा भूमी अधिग्रह व पुनर्वसन अथवा सार्वजनिक बंधकाम विभागाकडून अद्याप कोणतीही लेखी सूचना दिली गेली नाही असे प्रकल्पबाधीत कुटुंबाचे म्हणणे आहे. किंवा बाधीत जमिनीच्या मोबदल्यात केव्हा, किती व कोठे जमीन देणे प्रस्तावित आहे काय याविषयीही प्रकल्पबाधीत कुटुंबाला अद्याप काहीही लेखी सूचना अथवा आश्वासन प्राप्त नाही. परंतु शिवाजी विद्यापीठास कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम, कोल्हापूरकडून (जा. क्र. प्रशा/संकीर्ण/ ३१९९/२०१८, दिनांक ०६/०८/२०१८) प्राप्त पत्रान्वये असे निदर्शनास येते की एकूएण ९५.०० आर क्षेत्रापैकी पूलबांधणीकामी एकूण ०२.०० आर व कोल्हापूर बंधारा संलग्न रस्त्यासाठी ००.५० आर एवढे भूमी अधिग्रहण करण्याची आवश्यकता आहे. दिनांक १७/०२/२०१९ रोजी प्रकल्पबाधीताबरोबर झालेली चर्चा व प्रश्नावली भरून घेताना तद्नुषंगिक बाबींवर केलेली चर्चा करता अभ्यासगटास असे निदर्शनास आले की प्रकल्पबाधीतास सार्वजनिक बांधकाम विभागाकडून फक्त तोंडी चर्चेत असे सांगितले की प्रस्तुत रस्ता-पूल बांधणीकरीता प्रकल्पबाधीतांची दोन आर एवढी जमीन आवश्यक आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर अथवा जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्रकल्पबाधीतास कोणतीही लेखी सूचना नसल्यामुळे प्रस्तुत प्रकल्पबाधीतास प्रस्तावित प्रकल्पास विरोध अथवा स्वागतही करता येत नाही अशी स्थिती आमच्या लक्षात आली.

### ४.९: प्रस्तावित अधिग्रहणाचे स्थल परिप्रेक्ष्य:

उपरोल्लेख केल्याप्रमाणे मौजे कडगांव, ता. भुदरगड येथील गट क्रमांक २५२ अ व २५२ ब अशा एकूण ९५.०० आर शेतजमिनीतून प्रस्तावित पूल बांधणीकरीताचे अनुक्रमे तिसरे भूमी अधिग्रहण असणार आहे. यापूर्वी अनुक्रमे स्मशान व कोल्हापूर बंधाऱ्यासाठी याच गट क्रमांकाच्या जमिनीतून भूमी अधिग्रहण झालेले आहे. तसेच यापूर्वी ज्या कोल्हापूर बंधाऱ्याकरीता प्रस्तुत गट क्रमांकातून जमिनीचे अधिग्रहण

झालेले आहे त्याच कोल्हापूर बंधाऱ्यावरून अवजड व हलक्या अशा सर्व प्रकाराच्या वाहनांची वाहतूक सुरू असून पुढे सुरूवातीस उल्लेख केलेल्या गावांना स्पर्श करत हा एकूण ३७ किलोमिटरचा रस्ता राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ ला आजरा तालुक्यात संलग्न होतो. गट क्रमांक २५२/अ च्या एकूण ९५ आर क्षेत्रापैकी २.०० आर व गट क्रमांक २५२ ब च्या एकूण १४ आर क्षेत्रापैकी ००.५० आर एवढे क्षेत्र प्रस्तुत रस्ता-पूल बांधणीकामी अधिग्रहित करण्याची आवश्यकता आहे. (कार्य.अभि./साबावि (दक्षिण) कोल्हापूर/प्रशा/संकीर्ण/३१९९/२०१८/दिनांक ०६/०८/२०१८). परंतु महत्त्वाचा मुद्दा असा आहे की प्रकल्पबाधीत क्षेत्राच्या मधूनच पूल बांधकाम जाणार असल्यामुळे अगोदरच लहान असलेल्या धारणक्षेत्राचे दोन अतिलहान धारणक्षेत्रात रूपांतर होणार आहे. त्यामुळे दोन बाबी संभवतात. एक; प्रकल्पापोटी भूमी अधिग्रहणामुळे धारणक्षेत्र अधिक लहान होवून लागवडीस अकिफायतशीर होणार आणि दोन; पूल बांधणीनंतर प्रकल्पबाधीत जमीन मालकाला नवनिर्मित पोटखराब्यामुळे तांत्रिक प्रकल्पबाधीत क्षेत्राव्यतिरिक्त अधिकचे नुकसान सहन करावे लागणार आहे. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या प्रकल्पबाधीतास अधिग्रहणाच्या बदल्यात दिल्या जाणाऱ्या नुकसान भरपाईत या बाबींचा म्हणजेच आपोआप निर्माण होणाऱ्या अलागवडक्षम पोटखराब्याचा विचार होणे अत्यंत आवश्यक आहे.

### ४.१०: शासनाकडून प्रकल्पबाधीत कुटुंबाची अपेक्षा:

उपरोल्लेख केल्याप्रमाणे कोल्हापूर जिल्हा प्रशासन अथवा सार्वजनिक बांधकाम खात्याद्वारा प्रकल्पबाधीत कुटुंबास प्रकल्पाकरीता भूमी अधिग्रहणाविषयी कागदोपत्री कल्पना देण्यात आलेली नाही. त्यामुळे प्रकल्पबाधीत शेतकऱ्याला शासन दरबारी पत्रव्यवहार करण्यासाठी काोणताही संदर्भ उपलब्ध नाही. त्यामुळे प्रकल्पबाधीताचा प्रकल्पास ''ना विरोध - ना पाठिंबा'' अशी स्थिती निर्माण झाली आहे. परंतु प्रत्यक्ष क्षेत्र भेटीचे वेळी  व दिनांक १७/०२/२०१९ रोजीच्या प्रश्नावली भरून घेतानाच्या चर्चेच्यावेळी प्रकल्पबाधीताने प्रकल्पास काही अटी व अधिग्रहण पार्श्वभूमीच्या अधिन राहून प्रकल्पास विरोध नसल्याचे नमूद केले. विशेष म्हणजे प्रस्तावित गट क्रमांकावरील (२५२/अ) भूमी अधिग्रहण सलग तिसरे अधिग्रहण असूनही प्रकल्पबाधीतांचा अधिग्रहण अथवा रस्ता-पूल बांधणी प्रकल्पास विरोध नाही

हे विशेष. त्यामुळे प्रकल्पबाधीताने नमूद केलेली पार्श्वभूमी व भूमी बाधनाच्या मोबदल्यात केलेल्या मागण्या अवास्तव नाहीत असे दिसून येते.

# प्रकरण: ५
# प्रकल्पबाधीत कुटुंबाच्या न्याय्य मागण्या

## ५.१: अधिग्रहण पार्श्वभूमी व मोबदल्याविषयी:

प्रकल्पबाधीताने प्रस्तुत प्रकल्पापोटी आवश्यक जमीन अधिग्रहण व त्या बदल्यातील मोबदल्याविषयी पुढीलप्रमाणे मागण्या केल्या आहेत;

## ५.२: पार्श्वभूमी:

१. प्रकल्पबाधीताचे गट क्रमांक २५२/ब मधील ००.१३ आर क्षेत्राचे विभाजन करून प्रस्तावित रस्ता-पूल बांधकाम होणार असल्यामुळे या क्षेत्राचे अनुक्रमे अ) पूलाची एक बाजू, ब) पूलाखालील क्षेत्र व क) पूलाची दुसरी बाजू असे तीन भागात विभाजन होणार आहे.

२. बाधीत क्षेत्राचे तीन भागात विभाजन होणार असल्यामुळे;

   अ) प्रत्यक्षपणे पूल बांधकामाखाली अल्प क्षेत्र जात असले तरी दोन्ही बाजूस निर्माण होणाऱ्या दोन जमीन तुकड्यांत अधिकचा अलागवडक्षम पोटखराबा आपोआपच निर्माण होणार आहे.

   ब) असा पोटखराबा निर्माण झाल्यामुळे त्यावर कोणतेही उत्पादन अथवा लागवड करणे शक्य होणार नाही. परंतु तांत्रिकदृष्ट्याा नुकसान भरपाईही मिळणार नाही.

   क) पूलाच्या दोन्ही बाजूस अत्यल्प आकाराची दोन अकिफायतशीर धारणक्षेत्रे तयार होणार असल्यामुळे त्यावर कास्तकारी करणे अकिफायतशीरच नव्हे तर जवळजवळ असंभव होणार आहे. त्यामुळे

तांत्रिकदृष्ट्या अधिग्रहण कमी परंतु प्रत्यक्षात संपत्ती त्याग व नुकसान जास्त असणार आहे.

**५.३: प्रकल्पबाधीत जमिनीच्या मोबदल्याविषयी:**

उपरोल्लेखित स्वरूपीच एकंदरीत परिस्थिती असल्यामुहे प्रकल्पबाधीताचे म्हणणे असे आहे की जे न्याय्यही वाटते ते पुढीलप्रमाणे;

१. प्रस्तावित रस्ता-पूल बांधणीकरीता आवश्यक तांत्रिक अधिग्रहणाव्यतिरिक्त पूलाच्या दोन्ही बाजूस शिल्लक राहणारी जमीन सार्वजनिक बांधकाम विभागाने अधिग्रहित करावी. कारण उर्वरित जमीन प्रकल्पबाधीतास आर्थिकदृष्ट्या अकिफायतशीर असणार आहे.

२. उपरोल्लेख केल्याप्रमाणे प्रकल्प परिसरात धारणक्षेत्राचे आकारमान अत्यल्प असल्याने व खरेदी-विक्रीकरीता जमिनीचा पुरवठा पूर्णपणे ताठर असल्या कारणाने शेतजमिनीचा प्रती एकर बाजारभाव किमान चाळीस लक्ष रूपये आहे. तर रस्त्यानजिक जमिनीचा किमान बाजारभाव चार ते पाच लक्ष प्रती गुंठा आहे. त्यामुळे अधिग्रहित जमिनीस रस्त्यालगतची जमीन असे गृहित धरून त्याप्रमाणे रोख नुकसान भरपाई देणे आवश्यक आहे.

३. जमिनीच्या बदल्यात जमीन या तत्त्वावर आधारित युक्तिवाद करताना प्रकल्पबाधीताचे असे म्हणणे आहे की; मौजे कडगांव येथे सार्वजनिक बांधकाम खात्याची जमीन उपलब्ध आहे. या जमिनीतून नुकसान भरपाईपोटी एकूण पाच गुंठे जमीन त्यास मिळावी आणि या युक्तिवादात काहीही अतिशयोक्ती वाटत नाही.

**सारांशात:**

प्रस्तुत प्रकल्पबाधीत गट क्रमांकावर (२५२/अ व ब) रस्ता-पूल बांधणीकरीताचे सार्वजनिक बांधकाम खात्याद्वारा करण्यात येणारे भूमी अधिग्रहण सलग तिसरे अधिग्रहण आहे. परंतु प्रकल्पबाधीत कुटुंब अद्याप अधिग्रहणाविषयी अनभिज्ञ असल्याचे दिसून येते. तथापि प्रकल्पबाधीताचा प्रस्तुत प्रकल्पास विरोध नाही. अर्थात उपरोल्लेख केल्याप्रमाणे प्रकल्पबाधीताच्या अधिग्रहणाकरीता पूर्व अटी व मोबदल्याविषयीचे म्हणणे मान्य करणे न्यायाचे ठरेल. कारण यापूर्वी याच गट क्रमांकीत जमिनीमधून कोल्हापूर बंधारा व स्मशानभूमीकरीताचे अधिग्रहण झालेले असल्याने प्रस्तुत रस्ता-पूल कामाच्या अधिग्रहणाकरीता प्रकल्पबाधीत शेतकऱ्याचा प्रकल्पास विरोघ नसताना प्रामुख्याने ज्या दोन मागण्या आहेत त्या मान्य कराव्यात असा युक्तिवाद संयुक्तिक वाटतो. अर्थात मौजे कडगांव येथे सार्वजनिक बांधकाम खात्याची काही जमीन पडून आहे व अशा जमिनीतून प्रकल्पबाधीताने मगणी केल्याप्रमाणे पाच गुंठे जागा देवून प्रस्तुत प्रकल्प मार्गी लावण्यात कोणतीही अडचण येणार नाही. अर्थात मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गास अनेक शेतकऱ्यांनी तीव्र विरोध दर्शविल्यामुळे राज्य सरकारने प्रसंगी एक कोटी रूपये प्रती एकर अधिग्रहित जमीन मोबदला देण्याची तयारी दर्शविली आहे. असेच काहीसे धोरण महाराष्ट्र राज्य सरकारने नाणार तेलशुद्धीकरण प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसंदर्भातही अवलंबिले होतेच. म्हणजेच जिथे प्रकल्पग्रस्तांचा विरोध तीव्र असतो अशा ठिकाणी राज्य अथवा केंद्र सरकार प्रकल्पबाधीतांचे समाधान करण्याचा प्रयत्न करते. अर्थात अशा धोरणात काहीही चूक नसते. परंतु एकाच राज्यात विविध प्रकल्पबाधीतांकरीता विविध स्वरूपाचे मोबदले देणे न्याय्य होणार नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकल्पबाधीत एकच शेतकरी असून सलग तिसऱ्यांदा त्याच जमिनीवर अधिग्रहण होत असल्याचे आणि विशेष म्हणजे प्रकल्पबाधीताचा प्रकल्पास विरोध नसल्यामुळे रस्त्याच्या लगत जमिनीच्या बाजारभावाप्रमाणे एकूण प्रकल्पामुळे तीन तुकड्यात विभाजन होणारी सर्व जमीन अधिग्रहित करून संबंधित प्रकल्पबाधीताला मौजे कडगांव येथील सार्वजनिक बांधकाम खात्याच्या ताब्यातील भूखंडापैकी प्रकल्पबाधीताने मागणी केल्याप्रमाणे पाच गुंठे जमीन देण्याची तयारी सार्वजनिक बांधकाम विभागाची असावी.

# प्रकरण: ६
# निष्कर्ष व शिफारशी

राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ ला जोडणारा एकूण ३७ किलोमिटरचा पक्का रस्ता कोल्हापूर जिल्ह्याच्या भुदरगड तालुक्यातील अनुक्रमे ममदापूर, सोळांकूर, मोघर्डे, पनोरी, ऐणी, आरेगाव, राजापूर, जळकेवाडी, रक्षादेवी, नितवडे व कडगांव अशा एकूण दहा गावांना जोडून पुढे आजरा तालुक्यात उपरोल्लेखित महामार्गास जावून मिळतो. प्रस्तुत पक्का रस्ता या सर्व दहा गावांना जोडून त्यावरील वाहतूक सुकर व शक्य होण्याकरीता मौजे कडगांव, ता. भुदरगड हद्दीत २.६९ कोटी रूपये खर्चाचा एक मोठा पूल बांधणे आवश्यक आहे. प्रस्तुत पुलाकरीता मौजे कडगांव येथील शेतकरी श्री. आत्माराम दत्तात्रय देसाई यांची जमीन संपादित करणे आहे. परंतु प्रस्तुत शेतकऱ्याचा जमीन अधिग्रहणास विरोध असल्यामुळे प्रस्तावित पुलाचे बांधकाम ठप्प झाले असून उपरोल्लेखित सर्व दहा गावांना जोडणाऱ्या रस्त्याचे काम अपूर्ण अवस्थेत राहिले आहे. प्रकल्पप्रलंबनाचे प्रमुख कारण प्रकल्पबाधीत शेतकऱ्याच्या त्याच्या जमीन अधिग्रहणाच्या बदल्यात असलेल्या मागण्या पूर्ण न होणे हे आहे. त्यामुळे प्रस्तुत रस्ता-पूल प्रकल्पाच्या प्रलंबनाच्या कारणांचा मागोवा घेवून उभयपक्षी (प्रकल्पबाधीत शेतकरी व सार्वजनिक बांधकाम खाते) मान्य होवू शकेल असा परिस्थितीजन्य अभ्यासपूर्ण सापनि (Social Impact Analysis) अहवाल तयार करण्याचे काम शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागामार्फत पूर्ण करण्यात आले आहे. प्रस्तुत सामाजिक परिणाम निर्धारण अहवाल प्रामुख्याने प्राथमिक माहितीवर निर्भर असून याकामी प्रकल्पबाधीत कुटुंबाची आवश्यक तितक्या वेळा भेट घेवून प्रश्नावली व चर्चेच्या माध्यमातून प्राथमिक माहितीचे संकलन केले असल्याने प्रस्तुत सापनि अहवाल सत्यतेच्या निकषांवर पात्र ठरू शकतो अशाच प्रकारे तयार करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रस्तावित रस्ता-पूल प्रकल्प व प्रामुख्याने मौजे कडगांव, तालुका भुदरगड हद्दीत बांधावयाच्या पुलामुळे एकूण दहा गावांना त्याचा लाभ होणार असून या सर्व गावांची मानवी, कृषी व व्यापारी वाहतूक प्रस्तावि पूलाच्या बांधकामावर निर्भर आहे. कारण या सर्व वाहतुकीकरीता सध्या मौजे कडगांव येथील कोल्हापूर बंधाऱ्यावरूनच वाहतूक होत असल्याने ते अत्यंत धोकादायक असल्यामुळे प्रकल्पबाधीताच्या जमीन

त्यागाचा मोबदला देताना सार्वजनिक बांधकाम खात्याने व्यवस्थित विचार करून तसे प्रकल्पबाधीतास कागदोपत्री आश्वस्त केले व अंमलबजावणीची तात्काळ तयारी दर्शविल्यास पूल बांधकाम प्रकल्प मार्गी लागू शकतो.

प्रकल्पबाधीतास जमीन अधिग्रहणाबाबत व त्याच्या मोबदल्याबाबत मुख्यत्वे (जमिनीच्या बदल्यात जमीन) कागदोपत्री आश्वस्त करणे आवश्यक आहे असाच निष्कर्ष स्थळभेटीवरून निघतो. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ ला जोडणाऱ्या एकूण ३७ किलोमिटर लांबीच्या रस्त्याच्या कामाचे पूर्णत्व मौजे कडगांव, ता. भुदरगड येथील पूलाच्या बांधकामावर निर्भर असून त्याकामी श्री. आत्माराम दत्तात्रय देसाई या शेतकऱ्याची जमीन अधिग्रहित करावी लागणार आहे. प्रस्तुत अधिग्रहणाच्या अभ्यासाकरीता प्राथमिक माहितीचे संकलन व क्षेत्रभेटीतून निम्नउल्लेखित बाबी निदर्शनास आल्या.

**I.** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १७८ ला जोडणाऱ्या ३७ किलोमिटरच्या प्रस्तुत रस्त्याच्या टप्प्यातील सर्व दहा गावांचे पायाभूत सुविधा सर्वेक्षण पूर्ण केले. या सर्वेक्षणात ममदापूर, तवेले, वेंगरूळ, तककरवाडी, मेघोली, सोनुर्ली, शेकोली, परखेडे, गडदवाडी व न्हाव्याची वाडी इत्यादी गावांचा समावेश आहे.

**II.** मूलभूत पायाभूत सुविधांतर्गत एकूण ४४ उपसुविधांचे विवेचन दिलेले आहे. या सर्व उपसुविधा संबंधित गावात उपलब्ध नसतील तर अशा गावातील शेतकरी, विद्यार्थी, नोकरदार, आरोग्य समस्याधारक, दूध उत्पादक अथवा इतर नागरिकांना संबंधित पायाभूत सुविधा जसे की; शिक्षण, आरोग्य, बाजारपेठ इत्यादीपर्यंत पोहोचण्याचे कामी प्रस्तावित रस्त्यामुळे वेगवान होवू शकणार आहे. या गावांमधून जाणारा रस्ता जरी सध्या उपलब्ध असला तरी त्याचा आवश्यकतेनुरूप विस्तार व विकास आणि वर्षभर दळणवळण निर्भरता प्रामुख्याने मौजे कडगांव येथे प्रस्तावित पूलाचे बांधकाम व त्याकामी करावयाच्या भूसंपादनावर अवलंबून आहे.

III. मूलभूत सुविधांचा विचार केला तर पक्का रस्ता या सर्व गावांपैकी ४४.४० टक्के गावांना उपलब्ध नाही तर बस थांबा (८८.९० टक्के), रेल्वे स्टेशन (१०० टक्के), वीज उपकेंद्र (८८.९० टक्के), दूरध्वनी (१०० टक्के), पोस्ट ऑफीस (७७.८० टक्के), पोलीस स्टेशान (१०० टक्के) आणि स्थानिक बाजारपेठ (८८.९० टक्के) इत्यादी सुविधा या गावांना उपलब्ध नाहीत.

IV. सर्व आवश्यक सुविधा प्राप्त करण्याकामी या गावातील नागरिकांना जेथे या सुविधा उपलब्ध असतील अशा दुसऱ्या गावी जाणे आवश्यक आहे.

V. प्रस्तावित रस्ता-पूल पूकल्पाच्या बहुतांशी लाभधारक गावात माध्यमिक शाळा (५५.६० टक्के), कनिष्ठ महाविद्यालय (१०० टक्के), वरिष्ठ महाविद्यालय (८८.९० टक्के), औद्योगिक प्रशिक्षण संस्था (१०० टक्के), अभियांत्रिकी पदविका महाविद्यालय (१०० टक्के), अभियांत्रिकी पदवी महाविद्यालय (१०० टक्के) इत्यादींच्या सुविधा उपलब्ध नाहीत.

VI. शिक्षणासाठी या सर्व प्रकल्प लाभधारक गावांना इतर ठिकाणी जावे लागते व त्याकामी वर्षातील सर्व काळात वाहतूक, दळणवळण व रस्त्याच्या सुविधा उपलब्ध असणे महत्त्वाचे आहे.

VII. प्राथमिक कृषी सहकारी सोसायटी (३३.३० टक्के), सहकारी पतसंस्था (८८.९० टक्के), सहकारी बँक (८८.९० टक्के), विमा कार्यालय/शाखा (१०० टक्के), राष्ट्रीयकृत/व्यापारी बँक शाखा (१०० टक्के) इत्यादींच्या सुविधा या गावांत कंसात दर्शविलेल्या प्रमाणात उपलब्ध नाहीत. त्यामुळे जर अशा गावांचा संपर्क इतर सुधारित गावांशी आला तर त्यामुळे तेथील नागरिक व विद्यार्थ्यांना एक प्रकारे सामाजिक व नैतिक पाठिंबा मिळू शकतो. त्यामुळेही या सर्व गावांकरीता प्रस्तावित रस्ता-पूल प्रकल्प अत्यंत आवश्यक आहे.

VIII. प्रस्तुत रस्त्याकरीता खूप मोठया प्रमाणात जमीन हस्तांतरणाची आवश्यकता नसल्यामुळे याकामी जर सार्वजनिक बांधकाम खात्याने सकारात्मक भूमिका घेवून मौजे कडगांवच्या पूल बांधणीकरीता आवश्यक असलेल्या अल्पश: जमिनीचा प्रकल्पबाधीतास योग्य तो मोबदला

आर्थिक रक्कम अथवा जमिनीच्या बदल्यात जमीन असा दिला तर प्रस्तुत जमीन संपादन विनाविलंब होवून कामाचा वेग वाढून सत्वर पूर्णत्वास जाणे शक्य होईल.

**IX.** सार्वजनिक बांधकाम खात्याच्या आवश्यकतेनुसार जरी फक्त ०२.०० आर एवढेच क्षेत्र तांत्रिकदृष्ट्या बाधीत अथवा अधिग्रहित होणार असले तरीही या छोट्याशा जमीन तुकड्याचे पूल बांधकामामुळे पूल संलग्न दोन्ही बाजूस पोटखराबा निर्माण होणार असल्यामुळे प्रकल्पबाधीत कुटुंबाचे वास्तव नुकसान तांत्रिक अधिग्रहित जमीन आकारमानापेक्षा अधिक प्रमाणात होणार आहे. तसेच उर्वरित जमिनीचा लहान तुकडा कृषी लागवडीकरीता अकिफायतशीर होणार असल्यामुळे भविष्यातील कृषी लागवडीची गैरसोय प्रकल्पबाधीत कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या नुकसानकारकच ठरणार आहे. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या ०२.०० आर अधिग्रहणाचा युक्तिवाद प्रकल्पबाधीत कुटुंबाला मात्र अधिक नुकसानकारक असणार यात शंका नाही.

**X.** प्रस्तुत कुटुंबाच्या जमीन अधिग्रहण विषयक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे या कुटुंबाची प्रस्तुत गट क्रमांकान्वये २५२/अ व ब यापूर्वी अनुक्रमे कोल्हापूर बंधारा व स्मशान दहनभूमीकरीताही जमीन अधिग्रहण झालेले आहे. त्यामुळे प्रस्तुत रस्ता-पूल प्रकल्पाकरीता या कुटुंबाच्या २५२ अ याच गट क्रमांकावरील जमिनीचे अनुक्रमे तिसरे अधिग्रहण असणार आहे असे नमूद करणे अत्यावश्यक आहे.

**XI.** संबंधित कुटुंबास कशा दराने व एकूण किती मोबदला मिळणार याविषयी जिल्हा भूमी अधिग्रह व पुनर्वसन अथवा सार्वजनिक बंधकाम विभागाकडून अद्याप कोणतीही लेखी सूचना दिली गेली नाही. किंवा बाधीत जमिनीच्या मोबदल्यात केव्हा, किती व कोठे जमीन देणे प्रस्तावित आहे काय याविषयीही प्रकल्पबाधीत कुटुंबाला अद्याप काहीही लेखी सूचना अथवा आश्वासन प्राप्त नाही. परंतु शिवाजी विद्यापीठास कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम, कोल्हापूरकडून (जा. क्र. प्रशा/संकीर्ण/ ३१९९/२०१८, दिनांक ०६/०८/२०१८) प्राप्त पत्रान्वये असे निदर्शनास येते की एकूण ९५.०० आर क्षेत्रापैकी

पूलबांधणीकामी एकूण ०२.०० आर व कोल्हापूर बंधारा संलग्न रस्त्यासाठी ००.५० आर एवढे भूमी अधिग्रहण करण्याची आवश्यकता आहे.

**XII.** गट क्रमांक २५२/अ च्या एकूण ९५ आर क्षेत्रापैकी २.०० आर व गट क्रमांक २५२ ब च्या एकूण १४ आर क्षेत्रापैकी ००.५० आर एवढे क्षेत्र प्रस्तुत रस्ता-पूल बांधणीकामी अधिग्रहित करण्याची आवश्यकता आहे. (कार्य.अभि./साबावि (दक्षिण) कोल्हापूर/प्रशा/संकीर्ण/३१९९/२०१८/दिनांक ०६/०८/२०१८). परंतु महत्त्वाचा मुद्दा असा आहे की प्रकल्पबाधीत क्षेत्राच्या मधूनच पूल बांधकाम जाणार असल्यामुळे अगोदरच लहान असलेल्या धारणक्षेत्राचे दोन अतिलहान धारणक्षेत्रात रूपांतर होणार आहे.

**त्यामुळे दोन बाबी संभवतात;**

**XIII.** एक; प्रकल्पापोटी भूमी अधिग्रहणामुळे धारणक्षेत्र अधिक लहान होवून लागवडीस अकिफायतशीर होणार आणि;

**XIV.** दोन; पूल बांधणीनंतर प्रकल्पबाधीत जमीन मालकाला नवनिर्मित पोटखराब्यामुळे तांत्रिक प्रकल्पबाधीत क्षेत्राव्यतिरिक्त अधिकचे नुकसान सहन करावे लागणार आहे. त्यामुळे तांत्रिकदृष्ट्या प्रकल्पबाधीतास अधिग्रहणाच्या बदल्यात दिल्या जाणाऱ्या नुकसान भरपाईत या बाबींचा म्हणजेच आपोआप निर्माण होणाऱ्या अलागवडक्षम पोटखराब्याचा विचार होणे अत्यंत आवश्यक आहे.

**XV.** प्रकल्पबाधीत शेतकऱ्याला शासन दरबारी पत्रव्यवहार करण्यासाठी कोणताही संदर्भ उपलब्ध नाही. त्यामुळे प्रकल्पबाधीताचा प्रकल्पास ''ना विरोध - ना पाठिंबा'' अशी स्थिती निर्माण झाली आहे.

**XVI.** प्रस्तावित रस्ता-पूल बांधणीकरीता आवश्यक तांत्रिक अधिग्रहणाव्यतिरिक्त पूलाच्या दोन्ही बाजूस शिल्लक राहणारी जमीन सार्वजनिक बांधकाम विभागाने अधिग्रहित करावी. कारण उर्वरित जमीन प्रकल्पबाधीतास आर्थिकदृष्ट्या अकिफायतशीर असणार आहे.

**XVII.** जमिनीच्या बदल्यात जमीन या तत्त्वावर आधारित युक्तिवाद करताना प्रकल्पबाधीताचे असे म्हणणे आहे की; मौजे कडगांव येथे सार्वजनिक बांधकाम खात्याची जमीन उपलब्ध आहे. या जमिनीतून नुकसान भरपाईपोटी एकूण पाच गुंठे जमीन त्यास मिळावी आणि या युक्तिवादात काहीही अतिशयोक्ती वाटत नाही.

# संदर्भसूचीः

1. Burte, Himanshu (2014), The Smart City Card, Economic and Political Weekly, Vol. XXXXIX, No. XXXXVI, PP. 23-25.
2. Cao, Guangzhong, Changchun Feng, Ran Tao (2008), Local Land Finance in China's Urban Expansion: Challenges and Solutions, China and World Economy, 16 (2), 19-30.
3. Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, PP. 52-58.
4. Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, PP. 52-58.
5. Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, PP. 52-58.
6. Dhanmanjiri Sathe (2016), Land Acquisition: Need for a Shift in Discourse, Economic and Political Weekly, December 17, 2016, Vol. LI, No. XXXXXI, PP. 52-58.
7. Dutta, Ayona (2015), New Urban Utopias of Post-Colonial India, Entrepreneurial Urbanization in Dholera Smart City, Gujarat, Dialogues in Geography, Vol. V (I), PP. 03-22.
8. FAO (2009), Land Grab and Development Opportunities? Agricultural Investments and International Land Deals in Africa, FAO-IED-IFAD Report.
9. Ghatak, Maitreesh and Parikshit Ghosh (2011), The Land Acquisition Bill: A Critique and a Proposal, Economic and Political Weekly, October 8, 2011, Vol. XLVI, No. XXXXI.
10. GoI (2018), All India Rural Financial Inclusion Survey-2016-17, National Bank for Rural and Agricultural Development (NABARD), Mumbai.
11. Govt of India (2005), National Sample Survey Organization, New Delhi.
12. Hatekar, N (2003), Farmers and Markets in Pre Colonial Deccan: The Plausibility of Economic Growth in Traditional Society, Post and Present, No. 178, PP. 116-147.
13. Jenkins, R L Kennedy and Mukhopadhyay (Eds) (2014), Power, Policy and Protest: The Politics of India's Special Economic Zones, New Delhi, Oxford University Press.
14. Jnaki Nair (2015), Indian Urbanism and the Terrain of the Law, Economic and Political Weekly, September 5, 2015, PP. 54-63.
15. Kakani, RK, T L Ranga Ran and Tigga and Nutan Singh (2008), Insights into Land Acquisition Experiences of Private Business in India, Working Paper 08-11, Jamshedpur, XLRI School of Business and Human Resources.
16. NABARD (2018), All India Rural Financial Inclusion Survey: 2016-2017, National Bank for Agricultural and Rural Development, Mumbai.
17. Ramaswamy Iyer (2007), Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, July 28, 2007, PP. 3103.
18. Ramaswamy Iyer (2007, Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, July 28, 2007, PP. 3103.
19. Subramaniam C (1979), The New Strategy in Indian Agriculture: The First Decade and After, New Delhi, Vikas Publishing House.

20. Walter Fernandez (2004), Rehabilitation Policy for the Displaced, Towards A Just Displacement and Rehabilitation Policy, Economic and Political Weekly, March 20, 2004, PP. 1191.

## ANNEXURE: 1

DEPARTMENT OF ECONOMICS

SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

SOCOAL IMPACT STUDY OF KADGAON ROAD-BRIODGE

BENEFICIARY VILLAGE INFRASTRUCTURE SURVEY SCHEDULE / QUESTIONNAIRE

| Sr No | Village Details | Response |
|---|---|---|
| 1 | Name of the Village | |
| 2 | Taluka | |
| 3 | District | |
| 4 | Distance from Taluk Place | (Km) |
| 5 | Distance from District Place | (Km) |
| 6 | Population (Census 2011) | |
| 7 | Name of the Respondent | |
| 8 | Post Held by the Respondent | |
| 9 | Contact No | |
| 10 | Name of the Investigator | |
| 11 | Date of the Survey | |

| Sr No | Village Infrastructure Details<br>Infrastructure Head | Sub Head | Yes | No | If No Distance (Km) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Basic Infrastructure | Pucca Road | | | |
| | | Kuccha road | | | |
| | | Bus stand | | | |
| | | Railway Station | | | |
| | | Electricity Sub Station | | | |
| | | Telephone | | | |
| | | post office | | | |
| | | police station | | | |
| | | Local Market | | | |
| 2 | Drinking Water | Pipeline | | | |
| | | Tab Water | | | |
| | | Open Well | | | |
| | | Tube Well | | | |
| 3 | Irrigation | Percolation Tank | | | |
| | | Nala Bulding | | | |
| | | KT Waire | | | |
| | | Irrigation Tank | | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | Canal Network | | | |
| | | Coop Pipeline | | | |
| 4 | Agriculture Support | Agriculture Service Station | | | |
| | | APMC | | | |
| 5 | Dairy | Coop Milk Diary | | | |
| | | Prvt Milk Dairy | | | |
| 6 | Education | Primary school | | | |
| | | Secondary School | | | |
| | | Junior College | | | |
| | | Senior College | | | |
| | | ITI | | | |
| | | Engg Diploma Collage | | | |
| | | Engg Collage | | | |
| 7 | Human and Cattle Health | Private Hospital | | | |
| | | Private Doctor | | | |
| | | Rural Health Centre | | | |
| | | Government Hospital | | | |
| | | Cattle Hospital | | | |
| 8 | Finance and Credit | Primary Agri. Credit Society | | | |
| | | Co-op Patasanstha | | | |
| | | Co-op bank | | | |
| | | LIC office | | | |
| | | Nationalized Bank Branch | | | |
| 9 | Moral and Social Support | Youth Mandal | | | |
| | | Farmers Group | | | |
| | | SHG | | | |
| | | NGO | | | |

Sign of the Investigator                    Sign of the Respondent

**ANNEXURE: 2**

## अर्थशास्त्र अधिविभाग
## शिवाजी विद्यापिठ, कोल्हापूर 416004
## कडगांव रस्ता–पुल बांधकाम प्रकल्पातील बाधित गावाच्या सामाजिक परिणामांचे मुल्यांकन
## कुटुंब प्रश्नावली

**प्रकल्प बाधित कुटुंबाचा कमांक**

विभाग अ• कुटुंबाची सर्वसाधारण माहिती
1• प्रकल्पबाधित व्यक्तिचे नाव :–
१ अ• माहीती देणाऱ्याचे नाव :–
१ ब• प्रकल्पबाधित व्यक्तिशी नाते :–
१ क• फोन नं• :–
गाव :–
2• गाव (यादीप्रमाणे ————————राहण्याचे ठिकाण (वेगळे असल्यास) —————
2 अ• या गावात वास्तव्य –
१–३ वर्ष    ३–१0 वर्ष    १0 पेक्षा अधिक वर्ष
पिढीजात
2 ब)• सध्याचे राहण्याचे ठिकाण (पत्ता) :–
3 • जात :–
(अनु• जाती –१, अनु• जमाती –२, इतर मागासवर्गीय –३, भटके विमुक्त –४, सर्वसाधारण –५)
४• धर्म :–
(हिंदू – १, मुस्लित –२, जैन –३, ख्रिश्चन –४, शिख –५, बौध्द –६, अन्य –७)
५• राष्ट्रीयत्व – भारतीय अन्य अन्य असल्यास नमुद करा –
६• अ• – दारिद्रेरेषेवर (अे•पी•एल•)    ब• दारिद्र रेषेखाली (बी•पी•एल•)
क• – सांगता येत नाही•
७• दारेका यादी कमांक –
मनरेगा शासकीय योजनेत मजुर म्हणुन नोंद झाली आहे का ?
होय    नाही
8 • रेशनकार्ड    होय    नाही    कोणते ?
9• कुटुंबाचा प्रकार – एकसदस्य    विभक्त    एकत्रित
१0• कुटुंबातील सदस्यांची संख्या
११• कुटुंबातील आधारकार्ड नसणाऱ्या सदस्यांची संख्या
१२• तुमच्या भावकीतील कीती घरे या गावात आहेत?

१0• कुटुंबातील सदस्यांची माहीती

| | सदस्यांचे नाव | लिंग | वय | वैवाहीक स्थिती | कुटुंबप्रमुखाशी व्यक्तीचे नाते | सध्या वास्तव्य | शिक्षण | व्यवसाय | दुयम व्यवसाय असल्यास नाव | कौशल्ये |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | 8 | 9 | १0 |
| १ | | | | | | | | | | |

कुटुंबातील प्रशिक्षणासाठी जाणाऱ्या सदस्यांचे नावे
१) पुरूष वय शिक्षण
कोणत्या कोर्स साठी इच्छुक आहात ?
संपर्क दुरध्वनी क्र• मोबाईल
२• स्त्री वय शिक्षण
कोणत्या प्रशिक्षणासाठी इच्छुक आहात ?
संपर्क दुरध्वनी क्र• मोबाईल

११• सामाजिक स्तर
आपण अथवा कुटुंबातील कोणी खालीलपैकी एखाद्या सेस्थेचे सदस्य आहात काय? किंवा पूर्वी होतात काय?

| अ•क्र• | संस्था | सदस्याचे नाव |
|---|---|---|
| 1• | ग्राम पंचायत | |
| 2• | पंचायत समिती | |
| 3• | वि• का• सोसायटी | |
| 4• | ग्राम विकास मंडळ | |
| 5• | जंगल कामगार संस्था | |
| 6• | सहकारी बॅंक | |
| 7• | बचत गट | |
| 8• | दुध संस्था | |
| 9• | बाजार समिती | |
| 10• | भजनी मंडळ | |
| 11• | जात पंचायत | |
| 12• | तरूण मंडळ | |
| 13• | महिल मंडळ | |
| 14• | अन्य | |

**विभाग ब– मालकीच्या व ताब्यातील जमिनीचा तपशिल**

१• जमीन आहे नाही

| अ• क्र• | जमीन धारणा | एकर | गुंठे | जेथे जमिन आहे ते गाव |
|---|---|---|---|---|
| १ | एकूण जमीन धारणा | | | |
| २ | लागवडी खालील क्षेत्र | | | |
| ३ | लागवड योग्य पड जमीन | | | |
| ४ | जंगल व पडीक जमीन | | | |
| ५ | खंडाने घेतलेली जमीन | | | |
| ६ | खंडाने दिलेली जमीन | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७ | सिंचनाखालील जमीन | | | |
| | वनखात्याची अतिक्रमीत | | | |

१अ• शेत जमीनीचे घरापासून अंतर ------------मी•

२• आपल्या आसपास सध्या शेत जमीनीची एकरी दर काय आहे?

| जमीनीचा प्रकार | एकरी दर रूपये |
|---|---|
| मुरगुड | |
| मध्यम | |
| उत्तम | |
| बागाईत | |

आपण जमिनीत कोणता पिक घेता त्याचे विवरण भरा•

| अ•क्र• | खरीप पिके | एकर | अ• क्र• | रब्बी पिके | एकर | अ• क्र• | वार्षिक पिके | एकर |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | 1 | | | 1 | | |
| 2 | | | 2 | | | 2 | | |
| 3 | | | 3 | | | 3 | | |
| 4 | | | 4 | | | 4 | | |
| 5 | | | 5 | | | 5 | | |

२२• पिकांचे एकरी उत्पादन सांगा

| अ•क्र• | खरीप पिके | एकरी उत्पादन (क्विंटल) | अ• क्र• | रब्बी पिके | एकरी उत्पादन (क्विंटल) | अ• क्र• | वार्षिक पिके | एकरी उत्पादन (क्विंटल) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | 1 | | | 1 | | |
| 2 | | | 2 | | | 2 | | |
| 3 | | | 3 | | | 3 | | |
| 4 | | | 4 | | | 4 | | |
| 5 | | | 5 | | | 5 | | |
| | | | | | | | | |
| | | | | | | | | |

३• शेतीच्या पध्दती –

| साधन / पध्दती | होय / नाही | स्वतःचे | भाडयाचे |
|---|---|---|---|
| नांगरटीसाठी ट्रॅक्टर | | | |
| ठिंबक सिंचन | | | |
| डिझेल पंप | | | |
| थ्रेशर | | | |
| औषध फवारणी बंदुक | | | |
| अन्य | | | |

४• उत्पादन वाढीसाठी खालीलपैकी काही वापरता का?

| बब | होय / नाही |
|---|---|
| किटकनाशके | |
| सुधारीत बियाणे | |
| खते | |
| तण नाशक | |

५• सिंचन विषयक सूविधा
शेतात सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता – होय नाही

| अ•क्र• | स्त्रोत्र | संख्या | पाण्याचे (महिने) |
|---|---|---|---|
| १ | विहीर | | |
| २ | बोअर वेल | | |
| ३ | शेततळे | | |
| ४ | कालवा | | |
| ५ | लीप्ट | | |
| ६ | नदी नाले | | |
| ७ | तलाव | | |
| | अन्य | | |

६• वर्षातून किती पिके/हंगामी घेता?
खरीप रब्बी उन्हाळी बारमाही

**विभाग क – घर व मालमत्ता**

१• घराची मालकी – स्वतःचे भाडयाचे सामाईक शासकीय
२• घराचे स्वरूप – कच्चे पक्के अर्धे कच्चे
३• खोल्यांची संख्या – अंदाजे क्षेत्रफळ
भिंतीचा प्रकार– छताचा प्रकार– फरशीचा प्रकार–
४• शौचालय आहे नाही वापर आहे नाही
५• निर्धुर चूल आहे नाही
६• आंघोळीचे घर – आहे नाही
७• परसबाग – आहे नाही
सांडपाण्याची व्यवस्था – शोष खड्डा परसबाग गटार नाही
वीज– आहे नाही असल्यास पॉईंटची (दिव्यांची) संख्या –
१०• मालकीच्या साधनांचा तपशील

| अ•क्र• | साधन | संख्या | संध्याची किंमत |
|---|---|---|---|
| 1 | स्टील कपाट | | |
| 2 | पलंग | | |
| 3 | पंखा | | |
| 4 | फ्रीज | | |
| 5 | एल• पी• जी• गॅस | | |

| | | | |
|---|---|---|---|
| 6 | गोबर गॅस | | |
| 7 | टी• व्ही• | | |
| 8 | फोन | | |
| 9 | फर्निचर | | |
| 10 | कॅमेरा | | |
| 11 | मोबाईल | | |
| 12 | मोटार सायकल | | |
| 13 | जीप/ चार चाकी | | |
| 14 | ऑईल इंजन / मोटर | | |
| 15 | इले• पंप (हॉर्स पॉवर) | | |
| 16 | ट्रक्टर | | |
| 17 | ठिबक / तुषार | | |
| 18 | मळणी यंत्र | | |
| 19 | लोखंडी नांगर | | |
| 20 | अन्य | | |

**विभाग ड– पशुपालना विषयी माहिती**

१• कुटुंबाकडे असलेले पशुधन

1• पशुधन नाही
2• गाय
3• म्हैस
4• बैल
5• रेडे
6• वासरू
7• खोंड
8• कालवड
9• रेडकू
10• शेळया
11• मेंढया
12• कोंबडया
13• अन्य (स्पष्ट करा)

२• पशुधनापासून गेल्या वर्षभरातील उत्पन्न

| उत्पन्नाचा प्रकार | युनिट | उत्पादन | घरी वापरले | विकले | दर |
|---|---|---|---|---|---|
| दुध | लिटर | | | | |
| अंडी | नग | | | | |
| लोकर | किलो | | | | |
| पशुविक्री | नग | | | | |
| अन्य | | | | | |

३• पशुधनावर वार्षिक खर्च (रूपयामध्ये)
१• चारा / हिरवा चारा
२• पाणी
३• आंबोण/ पशुखाद्ये
४• लसीकरण/औषधोपचार
५• अन्य

**विभाग ई – कर्ज विषयक**

१• आपण कर्ज घेतले आहे का? होय नाही
होय असल्यास

| कोठुन घेतले | कारण | रक्कम | व्याजदर | परतफेड | शिल्लक |
|---|---|---|---|---|---|
| नातेवाईक / मित्र | | | | | |
| सावकार | | | | | |
| बॅंक | | | | | |
| सोसायटी | | | | | |
| बचत गट | | | | | |
| अन्य | | | | | |

**विभाग फ – शैक्षणिक**

१• कुटुंबात व्यावसायीक / तांत्रिक शिक्षण घेतलेले कुणी आहे का? होय नाही

होय असल्यास –

| अ•क्र• | नाव | कुटुंब प्रमुखाशी नाते | कोर्सचे नाव | पास /नापास |
|---|---|---|---|---|
| 1 | | | | |

२• शाळा अर्ध्यावर सोडल्याचे कुणी आहे का? होय नाही

होय असल्यास शाळा सोडल्याचे कारण

| अ•क्र• | मुलाचे नाव | वय | लिंग | कारण |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |

३• इयत्ता 9 वी व त्यावरील शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांबाबत

| अ•क्र• | नाव | सध्याची इयत्ता | शैक्षणिक संस्था | मगील वर्षाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |

**विभाग ग – जळणा विषयी**

१• घरी वापरलेल्या जळणाचा तपशिल

| | मासिक गरज | कोठून आणता | लागणारा वेळ | रक्कम | टंचाईचे महिने |
|---|---|---|---|---|---|
| लाकुड (किलो) | | | | | |
| रॉकेल (लिटर) | | | | | |
| गोवऱ्या (नग) | | | | | |
| अन्य (तपशिल) | | | | | |

अ• बायोगॅस आहे का ? होय नाही

असल्यास सध्याची स्थिती – चालू बंद

१ ब• घरी गॅस सिलेंडर आहे का? होय नाही

होय असल्यास एक सिलेंडर किती दिवस जातो ?

**विभाग ज – पिण्याचे पाणी**

१• पिण्याचे पाणी कोठुन भरता –

१•१ घरापासून अंतर मी•

२• गावात पाण्याच्या शुध्दीकरणासाठी काही केले जाते का? होय नाही

असल्यास तपशील–

३• टंचाईचे महीने –

४• टंचाईच्या काळात काय करता?

५• पिण्याचे पाणी कोण भरते ?

६• पाणी भरण्यात किती वेळ लागतो?
७• पिण्यासाठी किती पाणी आणता?
8• घरात वापरण्यासाठी किती पाणी आणता ?
9• घरात पाणी शुध्द करण्यासाठी काय करता?

**विभाग ह – आरोग्य विषयक**

१• कुटुंबातील कोणाला गंभीर आजार / अपंगत्व असल्यास –
व्यक्तीचे नाव आजाराचे स्वरूप अपंगत्वाचे स्वरूप
१
२
३

२• आजारपणात औषधे कोठुन घेता?
१• घेत नाही २• पारंपारीक वैद्य ३• आरोग्य रक्षक
४•खाजगी दवाखाना ५• सरकारी दवखाना ६• अन्य स्पष्ट करा

3• गेल्या 2 वर्षात खालीलपैकी एखादा आजार कोणाला झाला होता का?
आजार बाधित व्यक्ती
1• ताप /सर्दी / खोकला
2• कॉलरा
3• मलेरिया
4• टायफाईड
5• चिकनगुनिया
6• डायरिया
7•उष्माघात
8• सर्पदंश
9• अन्य स्पष्ट करा–

**विभाग म– कुटुंबाचे उत्पन्न**

अ• मजुरी पासून उत्पन्न

| हंगाम | स्थलांतरीत मजुरी | | कामाचे स्वरूप | मजुरी दर | |
|---|---|---|---|---|---|
| | पुरूष दिवस | स्त्रिया दिवस | ठिकाण | पुरूष दिवस | स्त्रिया दिवस |
| खरीप | | | | | |
| रब्बी | | | | | |
| उन्हाळी | | | | | |

ब• स्थानिक मजुरी

| स्थानिक मजुरीला जाणाऱ्याचे नाव | लिंग पुरूष / स्त्री | हंगाम खरीप रब्बी उन्हाळी | दिवस | मजुरी दर |
|---|---|---|---|---|
| | | | | |

क• झाडांपासून उत्पन्न

| अ•क्र• | झाडे | संख्या | उत्पादन | घरी वापरले | विक्री | विक्रीदर |
|---|---|---|---|---|---|---|
| अ झाडे | | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | |
| 2 | | | | | | |
| 3 | | | | | | |
| 4 | | | | | | |
| 5 | | | | | | |
| 6गवत | | | | | | |
| 7लाकुडफाटा | | | | | | |
| 8 करवंद | | | | | | |
| 9 तेंदू पत्ता | | | | | | |
| 10 अन्य | | | | | | |

ड• शेती पासून उत्पन्न

| अ• क्र• | पिकाचे नाव | हंगाम खरीप रब्बी उन्हाळी | सिंचीत 1/बिगर सिंचत 2 | क्षेत्र (एकर) | उत्पादन किलो | उपउत्पादन भारे / पेंडी | घरी वापरले | | विकले | | थ्वक्री दर रूपये किलो | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | उत्पादन किलो | उत्पादन भारे / पेंडी | उत्पादन किलो | उत्पादन भारे / पेंडी | उत्पादन किलो | उत्पादन भारे / पेंडी |
| | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | |

ई • शेतीतील खर्चाबाबत

| अ•क्र• | पिकाचे नाव | बीयाणे | खते रासायनिक | खते जैविक | शेणखत | मजुरी | वीज | ट्रक्टर भाडे | अन्य |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | | | | | | | | | |

फ • इतर मार्गापासून उत्पन्न

| अ•क्र• | बाब | |
|---|---|---|
| 1 | नोकरी | |
| 2 | व्यवसाय | |
| 3 | पेन्शन | |
| 4 | मुलांनी पाठविलेले | |
| 5 | जागा भाडे | |
| 6 | ट्रॅक्टर भाडे | |
| 7 | खण्ड | |

| | | |
|---|---|---|
| 8 | अन्य | |

न – प्रकल्प विषयक प्रश्न

आपली शेतजमिन प्रकल्पामध्ये गेली आहे का ? होय नाही

१• प्रकल्पामध्ये जाणाऱ्या जमीनीचा तपशिल

| अ•क्र• | सर्व्हे नं• /गट नं• | एकूण क्षेत्र एकर | क्षेत्र एकर |
|---|---|---|---|
| | | | |

1 अ• प्रकल्पासाठी जागा संपादुणिकेमुळे काय स्वरूपाचे नुकसान होणार आहे?

| | शेतजमिन | विहिर | बोअरवेल | शेतघर | जनावरांचा गोठा | फळबागा | इतर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| घटक | | | | | | | |
| संख्या | | | | | | | |
| युनिट | एकर | नग | नग | नग | नग | एकर | |

2• जमिन प्रकल्पाला द्यावी यासाठी तुमच्या वर कोणी दबाव आणला का? होय नाही

होय असल्यास कोणी ?

तरूण पिढी नातेवाईक गावकरी शासकीय अधिकारी अन्य

3• जमिनीस मिळणारी किंमत समाधानकासक वाटते का ? होय नाही

4• आपण प्रकल्पाला विरोध कसा दर्शवलात ?

विरोधी आंदोलन

जमीनीचे सौदे करताना ताठर भूमिका

समितीच्या माध्यमातुन

विरोध नाही

5• शासनाकडे तुमच्या प्रमुख मागण्या कोणत्या आहेत?

जमीनीच्या बदल्यात जमीन

बाजारभावापेक्षा जास्त दर

नव्या जागी गावाचे पुनर्वसन

प्रकल्पाग्रस्तास नोकरी

जमीन व घराची किंमत बाजार भावाप्रमाणे

अन्य

6• सदर प्रकल्पाचा तुम्हाला किंवा नातेवाईकांना फायदा होईल असे वाटते का? होय नाही

7• प्रकल्पामुळे खालील पैकी कोणत्या गोष्टी होतील?

| | होय | नाही |
|---|---|---|
| जमीनीला योग्य किंमत | | |
| रोजगार मिळेल | | |
| रोजगारच्या सेधी निर्माण होतील | | |
| संगता येत नाही | | |

9• तुम्ही शेती व्यवसाय चालू ठेवू इच्छिता काय? होय नाही

होय असल्यास कारण

व्यवसायाचे ज्ञान आहे

परंपरेने चालत आला आहे

वाडवडलांपासून हेच करत आलो आहे

अन्य
नाही असल्यास का?
तोटयातला व्यवसाय
कष्टाचे काम
तरूण पिढीचे दुर्लक्ष
समाजात किंमत नाही
अन्य
10• प्रकल्पाकडुन जमीनीचा मोबदला मिळाल्यावर त्यातुन नवीन जमीन खरेदी कराल का?
होय नाही
होय असल्यास कारण
शेती हाच व्यवसाय करणार
जमीन खरेदी फायदेशीर असते
जमीन खरेदी कोठे कराल
सध्याच्या गावापासूनचे अंतर
उत्तर नाही असल्यास कारण
पुन्हा शेतीकडे वळणार नाही
मिळालेल्या रक्कमेपेक्षा जमीनीची किंमत जास्त
मुलांच्या शिक्षण व लग्नासाठी रक्कम राखून ठेवणार
मजूरी करणार
11• नव्याने खरेदी करावयाची जमीन घरापासून किती अंतर आहे?
12• प्रकल्पाकडून मिळालेल्या पैशातून तेवढीच जमीन किंवा त्याहुन अधिक जमिन विकत घेणे शक्य होईल काय?
तेवढीच जमीन त्याहुन जास्त त्याहून कमी
13• प्रकल्पाच्या कामकाजाबाबत तूम्ही समाधानी आहात काय ? होय नाही
14• प्रकल्पामुळे या भागात रोजगाराच्या संधी निर्माण होतील असे वाटते का?
नही थेट रोजगार प्रत्यक्ष रोजगार सांगता येत नाही
15• प्रकल्पाचे खालील पैकी कोणते परिणाम होतील?

| | |
|---|---|
| गरीबांकडे पैसा जाईल | श्रीमंत अधिक श्रीमंत होतील |
| सामाजिक नाते संबंध सुधारतील | गटबाजी निर्माण होईल |
| शेतीतील नवी तंत्रे वापरता येतील | शेती करण्याच्या जुन्या पध्दती मोडून पडतील |

16• आपल्या कुटुंबातुन कोणी प्रकल्पाच्या कामावर मजुरीसाठी जाऊ इच्छिते का?
होय नाही
होय असल्यास संख्या – स्त्री पुरूष –
अन्वेक्षकाचे नाव – माहिती देणाऱ्याची सही
अन्वेक्षकाचा अभिप्राय –






**Shivaji University**
**Department of Economics**
**Kolhapur - 416 004**

Vidyanagar, Kolhapur,
Maharashtra 416004
www.unishivaji.ac.in

Contacts:
0231-2609177/79/80/81